
खोली क्रमांक चा...र
अक्षय जाधव

खोली क्रमांक चा...र

अक्षय जाधव

ई साहित्य प्रतिष्ठान

खोली क्रमांक चा...र (भयकथासंग्रह)

लेखक: अक्षय जाधव

९२ क, सोपाननगर, हडको.

मु. पो. सासवड, जि. पुणे,

४१२३०१

फोन : +९१ ७३५०९३३६९०

ब्लॉग – https://jadhavlibrary.blogspot.com/

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत

400604

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : १६ जून २०२६

©esahity Pratishthan®2026

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

अक्षय नंदकुमार जाधव,

शिक्षण: पदव्युतर पदवी,

सध्या मेडिकल इन्शुरन्स क्षेत्रात कार्यरत.

लहानपणापासूनच घरात वाचनाची आवड सगळयांनाच असल्याने आपसूकच ती गोडी मला देखील लागली. आई वडील शिक्षण क्षेत्रात असल्याने साहित्य विषयावर घरात चर्चाविमर्श घडायचेच तसचं घरात पुस्तकाचं वेगळं कपाट देखील असायचं. त्याच अनुषंगाने मराठी साहित्यातील बाललेखकांपासून ते दिग्गज लेखकांच्या साहित्याचा सहवास लहानपणापासूनच मिळत गेला. अगदी तीन डोक्यांचा राक्षस या बालकथांपासून वाचायला सुरुवात केलेल्या पुस्तक वाचनाचा प्रवास मृत्युंजय आणि पानिपतसारख्या थोर कादंबर्यांपर्यंत कधी आला कळेलच नाही.

पण खरी मोहिनी घातली ती वपु काळे, सुहास शिरवळकर, नारायण धारप या सारख्या लेखकांनी. त्यांच्या कथा वाचल्यानेच आपण देखील लिहावं का हा

विचार मनात पेरला गेला. रहस्य आणि भयकथा यात मला विशेष रुची असल्याने सुरुवातीला त्या प्रकारातच ब्लॉग लिहायला सुरुवात केली.

दरम्यान ई साहित्यच्या अनेक उपक्रमांपैकी पुस्तक प्रकाशन उपक्रमाबद्दल कळलं. माझी "आफ्रिकेतील अतर्क्य" हि कथा ई साहित्यच्या टीमने या आधीच प्रकाशित केलेली आहे. गुप्तहेरकथा आणि रहस्यकथा यात विशेष रुची असल्याने मी "गुप्तहेर सत्यवीर" हे पात्र निर्माण करून बऱ्याच गुप्तहेरकथा लिहिल्या आहेत. ज्यामधे गुप्तहेर सत्यवीरने सोडवलेल्या अनेक रहस्यमयी आणि गुन्हेगारी प्रकरणांचा समावेश होतो. गुप्तहेर सत्यवीरच्या अनेक थरारक प्रकरणातील पहिली कादंबरी ई-साहित्य मार्फत प्रकाशित झाली आहे. आणि आज माझा "खोली क्रमांक चा…र" हा कथासंग्रह सादर करत आहे.

वाचकांना या कथा आवडतील यात शंका वाटत नाही. वाचक हाच लेखकांना बनवतो आणि घडवतो म्हणूनच वाचकांसाठी अजून बऱ्याच कथा ई-साहित्यामार्फत प्रकाशित होतीलच. इंटरनेटवरील मराठी साहित्य जगतात ई साहित्यसारखी लोकं साहित्यप्रेमींना प्रेरणादायीच ठरतात. त्यामुळे त्यांच्याच सहयोगाने मराठी वाचकांची वाचनतृष्णा भागवण्याचे भाग्य मला मिळत राहो हीच प्रार्थना....

धन्यवाद.

आपलाच लेखक,

अक्षय नंदकुमार जाधव,

सासवड, पुणे

अज्ञान हि भयाची जननी आहे असं म्हणतात. अंधाऱ्या जागेत जायला लहान मुलंच काय तर मोठी माणसे सुद्धा घाबरतात. ती का तर अंधारात काय आहे हे माहित नसते म्हणून. अंधारात काहीही असू शकते हिंस्र जनावर, अमानवीय किंवा काही अतार्किक ज्यामुळे जीवास धोका उत्पन्न होऊ शकतो. भय हि अशी गोष्ट आहे जी भल्याभल्यांचे तोंडचे पाणी पळवते. साहित्य प्रकारात भय हा रस थरारक असला तरी अतिशय उत्कंठा वाढवणारा तसेच वाचकांना खिळवून ठेवणारा आहे. एखादी झपाटलेली हवेली किंवा निर्मनुष्य असलेली भीतीने भारलेली जागा या गोष्टी माणसामध्ये भीतीसोबतच एक उत्कंठा किंवा त्या जागा अशा का झाल्या असतील त्याविषयी जाणून घेण्याची एक उत्सुकता जात्याच असते. जुनेजाणते लोक अमुक एक गोष्ट करू नका तमुक एक गोष्ट निषिद्ध आहे असं सांगतात तेव्हा असं का? हे जाणून घेण्याची उत्सुकता कधीकधी भीतीवर मात करते आणि जी गोष्ट करू नका हे सांगितलेलं असतं तिचं गोष्ट करण्याचा मानवी मनाला मोह होतो.

भयकथा हि सगळ्यांनाच आवडते. भयकथा वाचून त्यातील घडणाऱ्या घटनांचं चित्रीकरण अक्षरशः जसच्या तसं चित्र डोळ्यापुढे उभे राहावे यातच भयकथेचे यश असते.

या कथासंग्रहात अशाच काही भयाचा अनुभव देणाऱ्या कथा लिहिलेल्या आहेत. ज्या कथा वाचून वाचकांना भय रसाचा अल्पसा अनुभव देण्याचा प्रयत्न एक लेखक म्हणून मी करणार आहे. जाणकार वाचकांनी तो गोड मानून घ्यावा हि विनंती...

घराबाहेर काळोख होता

म्हणून मी सगळी दारं लावून बसलो.

पण अंधाऱ्या खोलीतील

स्वत:चीच अंधुक सावली बघून

कोपऱ्यात घाबरून बसलो.

खोली क्रमांक चा...र

(प्रस्तुत सर्व कथा काल्पनिक असून कोणत्याही वास्तव घटनेशी किंवा जिवंत अथवा मृत व्यक्तीशी संबंध नाही. तसा संबंध आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा)

पडकं घर

संध्याकाळचे ६ वाजत आले होते. पावसाचा जोर ओसरलेला होता. दिवसभर माळरानावर चरून गुरेढोरे आपल्या गोठ्यांकडे शांतपणे जात होती. त्यांच्या मागे गुराखीसुद्धा त्यांच्यावर न ओरडता शांतपणे हातात काठी घेऊन चालत होता. वडाच्या पारावर काही रिकामटेकडी म्हातारी उगाचच सुतकी चेहरा करत समोरच्या कच्च्या रस्त्याकडे पाहत बसलेली होती. त्या वडाजवळचं पारगावचं छोटस सरकारी कार्यालय होतं. त्या कार्यालयाच्या दरवाजावर तशी पाटी सुद्धा लटकत होती. जवळपास मोडकळीला आलेल्या त्या कार्यालयात गणपत चोरगे हा सरकारी खात्यातील माणूस गावातील २-३ ग्रामपंचायत सदस्यांसोबत कसलीतरी चर्चा करत बसलेला होता.

पावसापाण्याचे दिवस होते तसेच या वर्षी पाऊस जरा जास्तीचाच झालेला होता. वादळवाऱ्यासोबत पावसाने गेल्या आठवड्यात चांगलेच थैमान घातलेलं होते. त्यामुळे गावातील काही घरांची छपरे उडून गेलेली होती. शेतात अतिरिक्त पाणी साठून राहिल्याने पिकांचे नुकसान झालेले होते. काही भागात जनावरांच्या गोठ्यांचे छप्पर खाली पडून काही गुरांना प्राण सुद्धा गमवावे लागलेले होते. सरकारने या गोष्टींची दखल घेऊन लागलीच संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन गावागावात जी काही नुकसानी झालेली होती

त्याची पाहणी करून सरकार दरबारी अहवाल सादर करायला सांगितलेलं होतं. त्यामुळे नुकसान झालेल्यांना नुकसानभरपाई मिळणार होती. यासाठीच शहरामधून इथे पारगावात गणपत चोरगे यांना पावसामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करायला यावं लागलं होतं. दिवसभर पाहणी करून संध्याकाळच्या सुमारास चोरगे गावातील सरकारी कार्यालयात दिवसभरात केलेल्या पाहणीमध्ये आढळून आलेल्या गोष्टींचा मसुदा तयार करत बसलेले होते. त्यांच्या आजूबाजूला गावातील मंडळी कोंडाळ करून उभी होती

"चला या २-३ गोष्टी व्यवस्थित लिहिल्या कि अहवाल तयार होईल" वहीत नजर रोखत पेनाने काहीतरी लिहित चोरगे बोलले.

"हा.. ते हुईलच ओ साहेब. पर नुसकान भरपाई कवा पतूर मिळन ते जरा सांगा कि" बाजूला उभा असलेला ग्रामसेवक कसबस हसत चोरगेंना म्हणाला.

त्याच्या या प्रश्नासरशी काहीश्या तिखट आवाजात चोरगे म्हणाले

"सरकारी काम आहे दादा. आत्ताशी कुठे अहवाल बनवायला मजकुर लिहितोय मी. तो मोठ्या साहेबांकडे सुपूर्द होणार. त्यात अजून काही कमी जास्त असेल तर पाहिलं जाईल. मग सरकारकडे ती फाईल पाठवल्यावर सरकार जेव्हा यावर मदतीची रक्कम जाहीर करेल तेव्हाच काय ते कळेल" एवढ बोलून चोरगेंनी पेन खिशाला लावला आणि वही मिटून त्यांच्या जवळील बॅगेत ठेवली.

चोरगेंच्या या बोलण्यावर अजून एक दुसरा खेडुत जो बाजूला उभा होता तो म्हणाला.

"कमी काय लिहू नका बघा त्या अवालात. जे असलं ते जास्तीच लिव्हा"

यावर काहीजण दात काढत खीखी करत हळू आवाजात हसू लागले.

"ते आता आमचे मोठे साहेबच ठरवतील" असं म्हणत त्या माणसाकडे दुर्लक्ष करत चोरगे जागेवरून उठले. खिडकीतून बाहेर पाहत त्यांनी पावसाचा अंदाज घेतला. पावसाने जरा विश्रांती घेतलेली होती. त्यामुळे जास्त पाऊस वाढायच्या आत परत शहराकडे आपल्या घरी जावे असा विचार चोरगेंनी केला. कारण गावातील नदीला पाणी जास्त आल्याने पुलावरून पाणी वाहू लागे मग लोकं त्या धोकादायक स्थितीत वाहने पुलावरून नेऊ शकत नसत.

चोरगेंनी स्वतःच वाहन सोबत आणलं नसल्याने गावातीलच टमटम किंवा अन्य वाहनांनी अंधार पडायच्या आतच गाव सोडावं असा विचार केला. त्यामुळे पटापट सामान आवरून अहवाल वही आणि काही कागदपत्रे पिशवीत ठेवून ती पिशवी खांद्याला अडकवून चोरगे जाण्यासाठी निघाले.

सरकारी कार्यालयातून चोरगें बाहेर पडले तसं त्यांच्यामागे कार्यालातील इतर ग्रामस्थसुद्धा त्यांच्यामागोमाग बाहेर आले.

"बर चला निघतो मी आता. अंधार पडायच्या आत घरी जावं लागेल. कारण उद्या परत शहरातील कार्यालयात जाऊन मसुदा सुपूर्द करावा लागणार आहे" खांद्यावरची पिशवी नीट करत आभाळाकडे टक लावून पाहत चोरगे म्हणाले.

"अवो साहेब आता अंधार पडन. रातच्याला इतच राहा कि सकाळी कोंबडा आरवायच्या वक्ताला लगोलग निगा. सरकारी बिल्डींगमध्ये चांगल्या खोल्या हायेत. माणसं पण आहेत हाताशी." एक वृद्ध ग्रामस्थ कपाळावर आठ्या पाडत म्हणाला.

"नाही नाही.. नको... थांबता येणार नाही आणि जरी थांबलो तरी उद्या सकाळी धावपळ होईल" चोरगे जरा पुढे जात म्हणाले.

"खरं हाये साहेब तुमचं.. पर पावसाने लयं थैमान घातलंय. गावच्या बाहेर जी नदी हाय तिच्या पुलावर पाणी आलं होतं सकाळी. तुम्ही आलात तवा जास्त न्हवत. पर आता जरा वाढलं आसन. कशाला रिक्स घेता. आन वाहन पन पुडे जाणार नाई" दुसरा एक ग्रामसेवक काळजीच्या सुरात म्हनला.

पण चोरगेंना थांबण्यात अजिबात रस न्हवता. गावातील लोकांमध्ये राहून त्यांची टकळी ऐकून घ्यायची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. एकतर आधीच दिवसभरच्या कामाने त्यांना शीण आलेला होता.

"हा साहेब उद्या सकाळी पानी कमी हुईल तवा जावा" असं बोलून बाजूचा अजून एक ग्रामस्थ ग्रामसेवकाच्या कानाला लागून काहीतरी पुटपुटला. तसा त्या ग्रामसेवकाचा चेहरा हिरवा गार पडला. त्याने बाजूच्या वृद्ध ग्रामस्थाला जवळ बोलावून कानात काहीतरी सांगितलं. तसं त्या वृद्ध ग्रामस्थाच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला. चोरगेंच यांच्या पुटपुटण्याकडे लक्ष न्हवत. ते आपले समोर रस्त्याकडे पाहत उभे होते.

"साहेब... ऐका जरा.. आजची रात थांबा सकाळच्या पहिल्या वक्ताला मी स्वतः तुम्हाला शहरापतूर सोडाय येतो" जराश्या खालच्या आवाजात चाचरत ग्रामसेवक बोलला.

"नाही हो.. मला निघावं लागेल" काहीश्या त्रासिक सुरात चोरगे म्हणाले आणि पुढे निघाले. ग्रामस्थांच्या आग्रहाला न जुमानता चोरगे चालू लागले.

मागे उभ्या असलेल्या गावकऱ्यामध्ये कुजबुज चालू झाली. चोरगे थांबायला तयार नव्हते ते तसेच पुढे चालत होते. मागे उभे असलेल्या गावकऱ्यांपैकी एकजण पळत चोरगेंजवळ आला आणि त्यांना थांबवून म्हणाला.

"साहेब अवो एक सांगायच हुत" चोरगेंच्या अगदी जवळ येत तो गावकरी म्हणाला.

तसं थोडंस थांबून त्रासिक चेहरा करत चोरगे म्हणाले - बोला.

"साहेब जर पुलावर पानी असलं आन तुमाला पूड जाता आलं न्हाई कि सरळ माघारी वळा आन गावात यावा, आनं कुटबी आसरा घेऊ नकासा साहेब"

त्याच्या या वाक्यावर चोरगेंना जरासं विचित्र वाटलं कि हे लोकं आजची रात्र गावातच काढा असं का म्हणत असावेत. कदाचित नुकसानभरपाई जास्त मिळावी म्हणून रात्री कोंबड, मटण वगैरे खायला घालून लांगुलचालन करायचा विचार दिसतोय यांचा. नक्कीच असंच असावं नाहीतर कशाला कोणी राहायचा आग्रह करेल.

"बर ठीक आहे" असं बोलून पिशवी सांभाळत चोरगे चालू लागले. काय डोक्याला ताप आहे असतो अशा लोकांचा असं वाटून परत काहीतरी कारण काढून त्या लोकांनी थांबवू नये म्हणून चोरगे भराभर चालू लागले. रस्त्याच्या शेवटी वळणावर चोरगेंनी सहजच मागे वळून पाहिलं. तर ते २-३ गावकरी गंभीर चेहऱ्याने चोरगेंकडेच पाहत उभे होते. चोरगेंना जरासं आश्चर्य वाटलं पण अंधार पडायला जरासाच अवधी असल्याने त्यांच्याकडे दुर्लक्ष करत ते पुढे चालू

लागले. वेशीबाहेर पोहोचताच त्यांना सुदैवाने एक टमटम उभी असलेली दिसली.

"चला लवकर आत बसा. पुलावर पानी वाढायच्या आत जायचं आहे" टमटमवाला ओरडत बोलला.

त्याच्या बोलण्यासरशी बाजूला बसलेले २-३ खेडूत आणि त्यांच्या बायका टमटममध्ये बसल्या. चोरगेसुद्धा मागच्या सीटवर एका कोपऱ्यात बसले आणी टमटम चालू झाली. आजूबाजूला पाहत चोरगे बसलेले होते. बाहेर बहुतांश ठिकाणी पाणीच पाणी झालेलं होतं. सगळ्या शेतात पाणी साठलेलं होतं. वेशीपासून टमटम आता बरीच दूर आलेली होती. काही वेळातच टमटम रस्त्यांवरील खड्ड्यातून मार्ग काढीत नदीच्या पुलाजवळ आलेली होती. समोर पाहिलं तर अख्ख्या पूल हा पाण्याखाली गेलेला होता. नदीचा प्रवाह देखील जोरदार होता. कालच्या पावसाने नदी चांगलीच दुथडी भरून वाहत होती. टमटमवाल्याने गाडी जागीच थांबवली.

"च्यामायला.. ज्याची भीती व्हती तेच झालं बगा. समदा पूल पान्याखाली गेला हाय" टमटम वाला चरफडत बोलला. टमटममधल्या प्रवाशांनीसुद्धा कपाळावर हात मारून घेतला.

"चला आता टमटम पुडे जाणार नाई. सरळ गावाकडं जाऊयात आता" एवढ म्हणून टमटमवाल्याने टमटम मागे वळवली. अंधार चांगलाच पडू लागलेला होता.

चोरगेंना कळेना कि आता काय करावे. आता परत गावात जावं लागणार आणि त्या ग्रामस्थांची टकळी ऐकत बसावं लागेल जे करण्याची चोरगेंना

अजिबात इच्छा न्हवती. ते करण्यापेक्षा इथच कुठेतरी रात्रीचा आसरा घ्यावा असं चोरगेंना वाटलं. टमटम वेशीजवळ पोहोचायच्या आत त्यांनी जरा दूरवरच टमटमवाल्याला टमटम उभी करायला सांगून खाली उतरले. चोरगेंना सोडून टमटम पुढे गावात निघून गेली. चोरगे एकटेच रस्त्यावर उभे होते. पुलावर पाणी असल्याने रस्त्यावर अन्य कोणतेही वाहन येजा करताना दिसत न्हवते. खांद्यावरची पिशवी सावरत चोरगे एकटेच रस्त्यावर चाललेले होते. आता अंधार देखील चांगलाच पडलेला होता. समोर एक कच्चा रस्ता डाव्या बाजूला वळलेला चोरगेंना दिसला. तिथून पुढे गावात विरुद्ध दिशेला प्रवेश करता येईल आणि कोणाच्या तरी घरात आजची रात्र आसरा मिळेल या उद्देशाने चोरगेंनी कच्च्या रस्त्यावरून आपली पावले उचलायला सुरुवात केली.

अंधार पडल्याने रातकिड्यांचा आवाज येत होता. दोन दिवस पाऊस पडल्याने गावात वीज देखील न्हवती त्यामुळे काळोख अजूनच भयाण वाटत होता. आजूबाजूला झाडी होती त्यातून किर्रकिर्र असा आवाज येत होता. रात्रीच्या अंधारात ती झाडी अक्राळविक्राळ रूप घेतल्याप्रमाणे दिसत होती. चोरगेंना खरंतर थोडी भीती वाटत होती. पण ती दूर करायला ते आपल्या कामाचा विचार करायला लागले. विचार करत रस्ता तुडवत चोरगे पुढे चाललेले होते. अजून कोणाचं घर दिसत न्हवत. रातकिड्यांचा आवाज वाढलेला होता. थोडं पुढे गेल्यावर जराश्या अंतरावर एक मिणमिणता प्रकाश दिसत होता. चोरगे त्या दिशेने चालू लागले. कच्च्या रस्त्याच्या आजूबाजूला काटेरी झाडे होती. चोरगे जसे जसे पुढे जाऊ लागले तसं तो प्रकाश त्यांना स्पष्ट दिसू लागला. कच्चा रस्ता सोडून जरा आतल्या बाजूला वळाल कि एक घर दिसत होतं. चोरगे त्या दिशेला वळले.

काही अंतर चालल्यावर ते त्या घराजवळ पोचले. घराच्या आतून मेणबत्त्यांचा प्रकाश बाहेर येत होता आणि बाजूच्या खिडकीजवळ एक मोठी मशाल लावलेली दिसत होती. ज्यामुळे घराच्या आसपासचा परिसर न्याहाळता येत होता. आजूबाजूला चांगलाच काळोख पडलेला दिसत होता. चोरगे त्या घराजवळ आले. जवळपास मोडकळीला आलेलं आणि जुन्या दगडांच बांधलेलं ते घर होतं. पण तरीही पडकं घर असल्याप्रमाणे ते वाटत होतं. कोण राहत असेल अशा घरात असं वाटुन चोरगेंनी दार वाजवलं. आतून कसलाच प्रतिसाद आला नाही. चोरगेंनी थोडा वेळ वाट पाहून परत दारावर आवाज केला. कोणीही बाहेर आलं नाही. चोरगेंना जरा आश्चर्य वाटलं. जरा जोर लावून त्यांनी दार वाजवायचा प्रयत्न केला तसं दार पुढे सरकलं. म्हणजे दार उघडंच होतं तर. स्वतःशीच पुटपुटत चोरगेंनी दार आत ढकलून घरात प्रवेश केला. आतमध्ये प्रवेश करताच चोरगेंना मेणबत्त्यांचा प्रकाश पसरलेला दिसला आणि आजूबाजूला लाकडी खोकी तसेच गवतांचे भारे पडलेले दिसत होते. चोरगे दरवाजाजवळच घुटमळले.

"आहे का कोणी आतमध्ये" चाचरतच चोरगे बोलले.

आतमध्ये एक खोली असलेली दिसत होती. घरातील समान अस्ताव्यस्त पडलेल दिसत होतं. घरात एक विचित्र प्रकारचा दर्प येत होता. आजूबाजूला निरीक्षण करत असतानाच चोरगेंसमोर अचानकच मक्ख चेहऱ्याची वयोवृध्द झालेली म्हातारी येऊन उभी राहिली. ती म्हातारी अशी अचानक येऊन थांबल्याने चोरगे दचकले. म्हातारी अशी अचानक कशी काय येऊन पुढ्यात उभी राहिली असं वाटून चोरगेंच्या तोंडातून शब्द फुटेना.

आतल्या खोलीतून ती म्हातारी आली कि अजून कुठून हे चोरगेंना कळेना. डोक्यावरचे पांढरे केस आणि अंगात खेडवळ पद्धतीची साडी घातलेली मक्ख चेहऱ्याची म्हातारी चोरगेंकडे पाहत उभी होती.

"म..मी.. गणपत चोरगे. सरकारी कामानिमित्त गावात पाहणीसाठी आलेलो होतो. परतत असताना नदीच्या पुलावर पाणी साठल्याने माघारी जाता आलं नाही. आजची रात्र राहायला कुठे जागा मिळते का ते पाहत असताना इथे आलो. आजची रात्र जागा मिळेल का मला?" एका दमात चोरगेंनी आपल्याबद्दलची माहिती सांगून इथे येण्याचा हेतू सांगितला. एवढ सांगून पण ती म्हातारी काहीही बोलली नाही कि तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले नाही. अजूनपण ती म्हातारी तशीच मक्ख्पणे चोरगेंकडे पाहत उभी होती. चोरगेंना तशी भीती वाटली. ते अंग चोरून तसेच उभे राहिले.

"बसा तित..." बाजूच्या मोडकळीला आलेल्या खुर्चीत बसण्याचा इशारा करत म्हातारी तशाच मक्ख चेहऱ्याने आतमध्ये निघून गेली.

चोरगेंना खरंतर यापेक्षा जास्त आदराची अपेक्षा होती. पण तसं काही झालेलं न्हवत. बाजूच्या कळकट खुर्चीवर बसत चोरगेंनी आपली पिशवी बाजूला ठेवून दिली. बाहेर हलकासा पाऊस चालू झाल्यासारखं वाटत होतं. एकदम वीज सुद्धा कडाडून गेली. पूर्ण परिसर काळोखात बुडून गेलेला होता. बर झालं हे घर सापडलं नाहीतर पुढे पावसात चांगलाच अडकलो असतो. पॅन्टवरची घाण हाताने साफ करत चोरगे मनातच म्हटले. अजूनही त्यांना घरात कसलातरी विचित्र दर्प येतच होता. पॅन्ट साफ करून चोरगेंनी वर पाहिलं तर म्हातारी हातात पाण्याचा ग्लास घेऊन उभी होती. चोरगे दचकले त्यांना वाटलं हि म्हातारी असंच अनपेक्षितपणे समोर येऊन दचकावू लागली तर आपल्याला

हृदयविकाराचा झटकाच येईल. म्हातारीच्या हातातील पाण्याचा ग्लास घेऊन चोरगेंनी घटघटा पाणी प्यायले. तेवढ्यात आतल्या खोलीतून कोणाच्या तरी खोकण्याचा आवाज आला. कोणीतरी जोरजोरात खोकत होतं. चोरगेंनी जरा चमकूनच म्हातारीकडे पाहिलं.

"आमचं मालक हायेत. आजारी असत्यात" म्हातारी गंभीर चेहरा करत म्हणाली. चोरगेंनी काहीही विचारलं नाही कारण चोरगेंना इतर कोणत्याही गोष्टीशी घेणं देणं नव्हतं. आजची रात्र कशीबशी काढायची एवढाच विचार त्यांनी केलेला होता.

"मी आजची रात्र थांबेन इथे. सकाळ झाली कि लगेच जाईन" चोरगे कशाबशा आवाजात म्हणाले.

त्यावर म्हातारीने नुसतच चोरगेंकडे पाहत हम्म.. असं म्हटलं आणी ती आतमध्ये निघून गेली. आता इथे झोपायचं कुठे असा विचार करत असतानाच आतून म्हतारी एक चटई आणि गोधडी घेऊन आली. चोरगेंच्या पुढ्यात ते टाकून आतमध्ये निघून गेली. चोरगे यावर काहीही बोलले नाहीत. बाजूला गवताचे ओलसर भारे, अस्ताव्यस्त समान अशा घाणेरड्या जागेत झोपायचं म्हणजे चोरगेंना शिसारीच आली. पण नाईलाज होता. आजची रात्र कशीबशी काढून इथून सकाळी लवकरच सटकायच असा विचार करत चोरगेंनी म्हातारीने आणलेली चटई खुर्चीच्या शेजारी पसरली. चटईवर अंग टाकून चोरगे शांतपणे पडले.

बाहेर पूर्ण किर्रर्र अंधार पडलेला होता. घुर्रघुर्र असा घुबडाचा घुत्कार तेवढा ऐकू येत होता. घरात आल्यापासून चोरगेंना एक प्रकारची अस्वस्थता जाणवत होती. जणू काही अंग दोराने बांधल्यासारखं वाटत होतं. काही वेळ ते

तसेच डोळे मिटून पडून विचार करू लागले. त्यांना झोप काही केल्या येईना. नाकात तो विचित्र दर्प परत दरवळला आणि त्यांची तंद्री भंग पावली. कसला वास असावा हा? चोरगेंच्या काही केल्या लक्षात येईना. चोरगेंना अचानक लघवीला जायची इच्छा झाली. पण आता इथे बाथरूम कुठे आहे हे म्हातारीला विचारायचं ते विसरूनच गेले होते. रात्री असं लघवीला जायची चोरगेंना सवय असल्याने बाथरूम कुठे आहे हे म्हातारीला विचारावं या उद्देशाने चोरगे उठले. हळूच आवाजात त्यांनी म्हातारीला "मावशी अहो ऐकता का.." अशी हाक मारली.

पण कोणीही आलं नाही. परत एक दोनदा चोरगेंनी आवाज देऊन देखील कोणीही आलं नाही. तेव्हा म्हातारी कदाचित झोपली असेल असं वाटुन आणि बाथरूमची सोय कुठे आहे हे माहित असणे गरजेचे असल्याने स्वतःच आतमध्ये जाऊन म्हातारीला विचारावं या उद्देशाने चोरगे हळूच आतमधल्या खोलीकडे जायला लागले. पुढे काही अंतरावर एक छोटासा लाकडी दरवाजा होता. चोरगे हळुवारपणे त्या दरवाजाजवळ आले. दरवाजा हलकासा उघडाच होता आणि आतून परत एकदा तोच विचित्र दर्प चोरगेंच्या नाकात शिरला. आतमध्ये कोणी असेल कि नाही हे चोरगेंना माहित न्हवत. एक अनामिक भीतीची शिरशिरी चोरगेंच्या मनात उगाचच उठली.

दरवाजाच्याजवळ जाऊन चोरगेंनी हळूच आत डोकावून पाहिलं. आतमध्ये खोलीत लाकडी फळ्या ठेवलेल्या होत्या. त्या फळ्यांवर काही काचेच्या बरण्या ठेवलेल्या होत्या आणि त्या पारदर्शक बरण्यांमध्ये कसलातरी द्रव पदार्थ ठेवलेला दिसला. आतमध्ये लावलेल्या काही मेणबत्यांमधुन जेवढा प्रकाश येत होता त्यातून जेवढे पाहता येईल एवढचं चोरगे पाहत होते. बाजूलाच

एक खाट ठेवलेली होती त्या खाटेवर कोणीतरी झोपलेलं होतं. चोरगेंना फक्त त्या व्यक्तीचे पाय दिसत होते. मगाशी म्हातारीने सांगितल्याप्रमाणे तिचे मालक असावेत असं चोरगेंना वाटून गेलं. पण म्हातारी आतमध्ये आहे कि नाही हे पाहण्याकरिता चोरगेंनी अजून दार हळूच पुढे करून आतमध्ये डोकावत पाहिलं. तर समोर एका लाकडी टेबलाजवळ म्हातारी आपले पांढरे केस मोकळे सोडून हात बाजूला पसरून पाठमोरी उभी होती. कदाचित डोळे मिटून काहीतरी करत असावी. बाजूला एका चुलीवर एक छोटंसं भांड असून त्यामध्ये काहीतरी उकळत होतं. त्याचाच विचित्र दर्प सगळीकडे पसरलेला होता. त्या चुलीजवळच बाजूला काही मानवी हाडे पडलेली दिसत होती..

चोरगेंनी हे सगळं पाहून एकदम आ वासला. हे नक्की काय चालू आहे हे त्यांना समजेना. अचानक त्यांची नजर म्हातारीच्या बाजूला असलेल्या एका मडक्यावर गेली आणि ते दृश्य पाहून भीतीने त्यांची बोबडीच वळाली.

त्या उपड्या ठेवलेल्या मडक्यावर एक कोंबडी उभी होती जिचं शीर कापलेलं होतं आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे शीर कापलेलं असून सुद्धा ती कोंबडी जिवंत होती. आपले पंख वरखाली हलवत हळुवारपणे हालचाल करत उभी होती. मानेवरच्या तिच्या कापलेल्या भागातून रक्ताचे थेंब मडक्यावर पडत होते. हे दृश्य पाहून चोरगे जागीच गोठून गेले. एवढ्यात घर्र्घर्र असा आवाज आला. तो आवाज खाटेवरच्या माणसाचा होता. त्या माणसाच्या घशातून तो घर्रघर्र असा आवाज येत होता. आश्चर्य वाटून चोरगेंनी तिकडे पाहिलं तर तो माणूस डोळे सताड मोठे करून दरवाजाकडेच पाहत होता. त्या माणसाला कदाचित जागचे हलता येत नसावे. त्या माणसाच्या कपाळावर एक काटकी धाग्याच्या सहाय्याने बांधलेली होती. त्या माणसाला कदाचित बोलताही येत

नसावे. त्याच्या घशातून फक्त घर्रघर्र असा आवाज येत होता. त्या माणसाचा तो भयंकर चेहरा पाहून चोरगेंची बोबडीच वळली. आधी ती शीर नसलेली जिवंत कोंबडी आणि आता तो डोक्यावर काटकी बांधलेला डोळे मोट्ठे करत बघत असेलला माणूस पाहून चोरगेंच्या अंगाला भयानं कापरं भरलं. त्यांचा श्वास वेगाने वरखाली होऊ लागला.

अंगात सगळं त्राण एकवटून चोरगेंनी तिथून काढता पाय घेतला. थरथरत्या अंगानेच चोरगे बाहेरच्या खोलीत आले. त्यांची विचारशक्ती पूर्णपणे कुंठीत झालेली होती. आल्याआल्या त्यांनी चटईवर अंग टाकलं. डोक्यावर पूर्णपणे गोधडी पांघरून ते धपापत्या उराने पडून राहिले. आपण आत्ता काय पाहिलं यावर त्यांचा विश्वासच बसत नव्हता. म्हातारीच ते केसं सोडलेलं रूप, मानवी हाडे आणि त्याहूनही कहर म्हणजे ती शीर कापलेली जिवंत कोंबडी. नक्की आपण काय पाहिलं ते सत्य होतं कि भ्रम त्यांनाच कळेना. आपण स्वप्नात तर नाही ना असं चोरगेंना वाटलं. म्हातारी नक्की काय करत होती? खाटेवरचा तो विचित्र माणूस नक्की कोण होता? त्याची हि अवस्था कशामुळे झाली असेल? एक ना एक प्रश्न चोरगेंना पडत होते. या कुशीवरून त्या कुशीवरून वळण्याचे सुद्धा धैर्य चोरगेंमध्ये न्हवते. या घरात्तून कुठेतरी पळून जावं असं चोरगेंना वाटलं. पण पळून जाणार कुठे? मध्यरात्री झालेली होती.

अचानकच बाहेर घुबडांचे घुत्कार वाढले. बाहेरच्या झाडांवर वटवाघळांची फडफड होऊ लागली. अशात बाहेर पडून जायचं कुठे हे काही चोरगेंना कळेना. विचार करता करताच चोरगेंना कधी झोप लागली हे कळलेच नाही.

नंतर चोरगेंना अचानक जाग आली ती खिडकीच्या धाडकन उघड्ण्यानेच. हवेच्या जोरदार तडाख्याने भिंतीवरील खिडकी उघडली होती आणि बाहेरचा थंडगार हवेचा झोत आत खोलीमध्ये शिरला होता. डोळे किलकिले करून चोरगे चटईवर उठून बसले. खिडकीतून थंडगार हवा आतमध्ये येत होती. झोपेची झापड जाऊन चोरगे जरा भानावर आले. त्यांना मगाशी आतमधल्या खोलीत पाहिलेला प्रसंग आठवला आणि त्यांच्या अंगावर शहारे आले. त्यांनी खिडकीतून बाहेर पाहिलं तर बाहेर अजूनही अंधार पडलेला होता. आतमध्ये म्हातारी अजून काय करत असेल या विचारांनीच चोरगेंना घाम फुटला. लघवी करण्यासाठी म्हणून चोरगे जागेवरून उठले आणि घराबाहेर आले. बाहेर पूर्ण काळोख होता अजूनही चांगलीच रात्र आहे अशी जाणीव चोरगेंना झाली.

घराला थोडासा वळसा घालून चोरगे घराच्या मागच्या बाजूला आले. आजूबाजूला काही झाडे होती आणि पुढे झाडांच्या रांगाच रांगा होत्या. आसपास कुठेही वस्ती किंवा घरं असल्याचं त्यांना दिसत नव्हतं आणि तसंही अंधार अजूनही चांगलाच असल्याने दुरवरच काही दिसतही नव्हतं. लघवी आटोपून चोरगे मागे वळणार इतक्यात त्यांना दूरवर झाडांच्या रांगेपुढे शेकोटीसारखं काहीतरी जळताना दिसलं. काय असावे बरे? असा विचार करत असतानाच चोरगेंची पावले त्यांच्या नकळतच पुढे जाऊ लागली. आसपास भयाण शांतता होती. चोरगे हळुवारपणे त्या जळत्या शेकोटीकडे जाऊ लागले. चोरगेंच्या संवेदना पूर्णपणे गलितगात्र झालेल्या होत्या. ते भारल्याप्रमाणे चालत चालत शेकोटीकडे जाऊ लागले. झाडांच्या रांगा ओलांडून ते शेकोटीपासून काही अंतरावरच आले. जवळ येईल तसं शेकोटीची आग गडद दिसू लागली

होती. तेथील जागा ही मोकळी मैदानी होती. आसपास झाडे किंवा कसलाही आडोसा नव्हता. एक झाडापाशी ते चालत चालत आले. तिथे आल्यावर एका झाडाच्या झुकलेल्या फांदीचा फटका त्यांच्या तोंडावर बसला. अंधारात त्यांना फांदी दिसली नसल्याने ती फांदी त्यांच्या तोंडाला लागलेली होती.

फांदी तोंडावर लागताच चोरगे भानातून वर आल्यासारखे करत आजूबाजूला पाहू लागले. प्रथम त्यांना समजलंच नाही कि काय आलंय तोंडावर. पण नंतर बाजूच्या झाडाची फांदी पाहून त्यांना जरा हायसं वाटलं. चोरगे आता पुढे न जाता जागीच थांबून समोर शेकोटीकडे पाहू लागले.

लहान आकाराची लाडकांची रास करून आग लावलेली होती आणि त्या आगीपुढे कोणीतरी बसलेलं त्यांना दिसतं होतं. लांबून त्यांना फक्त शेकोटीच दिसतं होती. पण जवळ आल्यावर त्यांना कोणीतरी शेकोटीपुढे बसलं असल्याच दिसलं. ती व्यक्ती शेकोटीकडे पाहत बसलेली होती. तिच्यापुढे एक भांड असल्याचं दिसतं होतं. झाडाच्या मागे जात चोरगेंनी डोळे बारीक करून कोण बसलं आहे ते पाहिलं आणि त्यांना धक्काच बसला. चोरगे ज्या घरात थांबलेले होते त्या घरातील म्हातारीच त्या शेकोटीपुढे बसल्याचं त्यांना दिसलं. तिने अंगामध्ये पायापर्यंत येणारा एक विचित्र झगा घातला असल्याने चोरगे आधी त्या म्हातारीला ओळखू शकले नाहीत. समोरच्या असलेल्या भांड्यातील कसलातरी पदार्थ आगीमध्ये टाकत आगीकडे काहीतरी पुटपुटत म्हातारी स्तब्धपणे बसलेली होती. बाजूच्या काही ठराविक अंतरावर सगळीकडे कसलीतरी राख पडलेली दिसत होती

चोरगे डोळे फाडून त्या म्हातारीकडे पाहत होते. एवढ्या रात्री म्हातारी इथे काय करत आहे हे चोरगेंना समजेना. चोरगे झाडाच्या आधाराने उभे होते. वातावरण पूर्णपणे स्तब्ध होतं.

इतक्यात म्हातारीच्या बाजूच्या झाडीमधून कसल्यातरी प्राण्याच्या गुरगुरण्याचा आवाज आला. चोरगे झाडाला घट्ट पकडत मागे आले आणि लपून पाहू लागले.

परत एकदा गुरगुरण्याचा आवाज आला. तो आवाज नक्की कुत्रा किंवा कोल्हा कोणत्या प्राण्याचा होता समजत न्हवत. चोरगे श्वास रोखून समोर पाहू लागले. म्हातारी आता आगीमध्ये पटापट भांड्यातून काहीतरी काढून टाकू लागली. गुरगुरण्याचा आवाज वाढत होता. म्हातारीच्या बाजूच्या झाडीतून कसलीतरी खुसपूस झाली आणि एक मोठ्या आकाराचा प्राणी बाहेर आला. त्याचे तीक्ष्ण दात लांबून सुद्धा दिसत होते. तो आकाराने कुत्र्यापेक्षाही मोठा आणि रंगाने पूर्ण राखाडी होता. त्या प्राण्याचे कान उभे राहिलेलं होते. गुरगुरत त्या प्राण्याने म्हातारीकडे पहिले. म्हातारीने बाजूला ठेवलेला चाकू काढला आणि आपला डावा हात पुढे करून त्यावर तो चाकू फिरवला. रक्ताची धार म्हातारीच्या हातातून पडू लागली. पण म्हातारीच्या तोंडावरचे भाव काही बदलले नाही उलट म्हातारीने रक्ताळलेला हात त्या प्राण्यापुढे धरला. हे दृश्य पाहून चोरगेंना मळमळल्यासारखे झाले आणि उलटी होईल कि काय असं वाटलं. म्हातारीच्या हातातून रक्ताची धार पाहून तो प्राणी गुरगुरत म्हातारीच्या हाताजवळ आला आणि त्या प्राण्याने तो हात तोंडात पकडून हातातून गळणारे रक्त गुरगुरत पिऊ लागला.

चोरगेंना आता पुढचे दृश्य पाहावेना. त्यांना खूप घाम फुटलेला होता आणि त्यांच्या शरीरात कंपने जाणवू लागलेली होती. ते हळूहळू मागे सरकू लागले. आपल्या उपस्थितीची जाणीव होऊ न देता त्यांना मागच्या मागे पळून जायचं होतं. मागे काही पावले टाकत असतानाच त्यांचा तोल गेला आणि ते खाली पडले. असं पडल्यामुळे आता त्या म्हातारीला आणि त्या विचित्र प्राण्याला आपली चाहूल लागली असेल असं वाटुन झटक्यात उठत मागे वळूनही पाहता जीव खाऊन चोरगे धावत सुटले. तसं त्या प्राण्याने मोठ्याने गुरगुरत आवाज केला. त्या प्राण्याने आपल्याला पाहिलं असून आता तो आपल्याचं मागे येईल असं वाटल्याने चोरगे जीवाच्या आकांताने धावत सुटले. रात्रीच्या त्या भयाण काळोखात चोरगे कोणत्या दिशेने पळत आहेत हे देखील त्यांना सुधरेना. मागे वळून तो प्राणी आपल्या मागावर येतोय कि नाही हे देखील बघण्याची इच्छा त्यांना न्हवती. उर फुटेपर्यंत ते पळतच राहिले.

म्हातारीच्या त्या पडक्या घरापासून त्यांना शक्य तितक्या लांब पाळायच होतं म्हणून ते वेगळ्याच दिशेने धावत होते. चोरगेंच पूर्ण अंग घामाने डबडबलेल होतं. धावत धावत ते एका दगडी घरापाशी येऊन पोहोचले. धापा टाकत मान खाली घालून त्यांनी जरा दम खाल्ला. ते खूप लांब पळत आले आहेत असं त्यांना वाटलं. जरा दम खाऊन झाल्यावर त्यांनी मग समोरच्या घराकडे नजर वळवली आणि समोर पाहून ते अवाकच झाले. कारण ते लांब जायचं सोडून त्याचं म्हातारीच्या पडक्या घरासमोर उभे होते. लगेच मागे जात त्यांनी परत त्या घरापासून लांब जात दूर धावायला सुरुवात केली. अंधाऱ्या मार्गातून कसबस वाट काढत चोरगे पळत होते. काही वेळ धावल्यानंतर त्यांना मिणमिणत्या प्रकाशातील एक घर दिसू लागलं ते अजून वेगाने धावत त्या

घराजवळ गेले आणि त्यांनी त्या घराकडे पाहिलं तर त्यांना हादराच बसला कारण ते परत एकदा त्या म्हातारीच्या पडक्या घरापाशीच येऊन पोहोचले होते. चोरगेंची मती कुंठीत होऊन ते वेड्यासारखे घराकडे पाहत बडबडू लागले. असं का होतंय त्यांना कळेना. आपल्याला या गलिच्छ घरापासून दूर का जाता येत नाहीये. पण तरीही थकलेल्या अवस्थेत ते तसेच घरासमोरून पळू लागले. हळू हळू धावत चोरगे बडबड करत पळत होते.

काही अंतर धावून झाल्यावर पुन्हा चोरगेंना एक घर दिसलं जवळ जाऊन पाहताच परत तेच म्हातारीच पडकं घर.

चोरगेंना आता वेड लागायची पाळी आलेली होती. हे काय होतंय त्यांना समजतच न्हवत. चोरगे अतिशय थकून गेलेले होते. अंगात त्राण उरलेला न्हवता. तरीही न थांबता ते धावतच राहिले. कितीतरी वेळ चोरगे धावत होते आणि कितीतरी वेळा चोरगेंना त्याचं पडक्या घरापुढून जावं लागतं होतं. नंतर धावता धावता चोरगेंची शुद्ध हरपली आणि ते जमिनीवर कोसळले...

कोंबडा आरवला आणि त्याने पहाट झाल्याची जाणीव गावाला करून दिली. काल रात्री चोरगे जमिनीवर उताणं होऊन पडलेले होते. ते अचानक जागे होऊन जमिनीवरून उठून बसले. रस्त्यावर माणसांची लगबग चालू झाली होती. सकाळ झाल्याने चोरगेंना जरा हायसं वाटलं. जागेवरून उठून थोडं अंतर चालून ते पुढे गेले. पुढे माणसांची खूप मोठी गर्दी जमलेली होती. काय झालंय हे कळत न्हवत. बाजूने एक माणूस चाललेला होता त्या माणसाला चोरगेंनी हटकल आणि पुढे काय झालंय हे विचारलं पण तो माणूस चोरगेंकडे साफ दुर्लक्ष करून त्यांना न पाहताच पुढे निघून गेला. चोरगेंनी मग स्वतः जवळ जाऊन पाहिलं तर एक माणूस जमिनीवर उताणा पडलेला होता. लोक त्या माणसाला उठवण्याचा

प्रयत्न करत होते. चोरगेंनी जवळ जाऊन पाहिलं तर त्या जमिनीवर पडलेल्या माणसाच्या अंगावर चोरगेंनी घातलेलेच कपडे दिसत होते. चोरगेंना आश्चर्य वाटलं. जरा जवळ जाऊन पाहताच चोरगेंना धक्काच बसला कारण तो जमिनीवर पडलेला माणूस दुसरा तिसरा कोणी नसून चोरगेच स्वतःच होते. गावातील लोकांनी चोरगेंच्या देहाला उचलून बाजूला नेलं.

"अरे हे काय करताय.. मी इथे आहे" असं बोलून चोरगेंनी गर्दीचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. पण त्या गर्दीमधील कोणीही चोरगेंचा आवाज ऐकू शकत न्हवत. कोणालाही त्यांचा आवाज ऐकू कसा येत नाही हे पाहून चोरगेंना आश्चर्य वाटलं. खूप आवाज देऊनही कोणीही पाहत न्हवत. हताश झालेल्या चोरगेंना काहीच कळत नव्हतं. तेवढ्यात त्यांना रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला एका मोठ्या दगडावर पडक्या घरातील तीच म्हातारी काल रात्री घातलेला लांब झगा घालून बसलेली दिसली आणि तिच्या डावीकडे पडक्या घरातील खाटेवर पडलेला खोकणारा माणूस डोळे मोठे करून आपल्या चवड्यावर बसलेला होता. त्याच्या कपाळावर अजूनही तशीच एक काटकी धाग्याने बांधलेली दिसत होती. त्यांना पाहताच चोरगे स्तब्धच झाले.

तिकडे गावकऱ्यांची गर्दी चोरगेंचा मृतदेह घेऊन पुढे निघून गेली. इकडे ती म्हातारी चोरगेंकडे पाहत आपले पिवळे दात विचकत हसू लागली आणि हातानेच आपल्या बाजूच्या असलेला दगडावर बसायला सांगत चोरगेंना इशारा करत बोलावू लागली.

चोरगे ते दृश्य पाहून डोक्याला हात लावत मटकन खालीच बसले...

==========

चाहूल

दरवाजाच्या फ़टीतून डोळे लावून ती बाहेर पाहत होती. अंधार पडायला सुरुवात झालेली होती. जसजसा अंधार वाढत होता. तशी तिच्या जीवाची घालमेल देखील वाढत होती. दरवाजाच्या फटीमधून बाहेरचं जेवढं शक्यं असेल तेवढं ती पाहत होती. बाहेरची कोणतीही हलचाल अथवा कोणताही आवाज तिला न पाहता आणि ऐकता सोडायचा नव्हता.

"आई.." अचानक तिच्या मागून आवाज आला तशी ती गर्रकन मागे वळली.

"सोनू तू... अगं किती दचकले मी. तू इथे काय करतेयस. तुला मी आतल्या खोलीत जाऊन बसायला सांगितलं होतं ना" तिने दटावणीच्या सुरात विचारलं.

मागे सोनू नावाची सात वर्षाची मुलगी हातात एक छोटी बाहुली घेऊन उभी होती.

"तू किती वेळची इथेच आहेस. मी आतमध्ये एकटीच होते. मग वाट पाहून मीच बाहेरच्या खोलीत आले तुला पाहायला" सोनुने हळू पण लाडिक आवाजात सांगितलं.

"अगं मी चाहूल घेतेय. म्हणूनच उभी आहे इथे. तुला आतमध्ये बसायला सांगितलय ना मी" तिने परत आवाजाला धार आणत विचारलं.

"आतमध्ये नको... मला एकटं वाटतंय" सोनुने परत तसंच लाडीकपणे विचारलं.

"एकटी कशाने आहेस तू ... दादु आहे ना सोबत तुझ्या" तिने तिरक्या डोळ्याने पाहत विचारलं.

"दादू उगाचच मगापासून तुझ्यासारखा बाहेर पाहण्यासाठी खिडकीला डोळा लावुन बाहेर पाहत बसलाय''

"काय... वेडा आहे का तो" रागाने ती आतल्या खोलीकडे जायला वळली आणि तिच्या पाठोपाठ सोनूसुद्धा निघाली.

आतल्या खोलीमध्ये पाच वर्षाचा दादु बंद खिडकीला डोळा लावून बाहेर काहीतरी पाहण्याचा प्रयत्न करत होता.

आतमध्ये येताच ती त्याच्यावर डाफरली "दादु काय करतोयस तू .. कशाला पाहतोयस बाहेर. मी सांगितलं होतं ना तुला कि सोनूसोबत खेळत बस म्हणून "

तिच्या अशा अचानक येण्याने दादु लगबगीने खिडकीपासून दूर झाला.

"का पाहतोयस तू बाहेर? काय सांगितलं होतं मी ?" तिने परत प्रश्न केला.

सोनू तिच्यामागे फक्त उभी राहून आपल्या छोट्या बाहुलीशी चाळा करत आपल्या लहान भावाला आपली आई कशी ओरडत आहे हे पाहत उभी होती.

"अरे बोलशील कि नाही... काय करत होतास?" तिने परत छोट्या दादुला विचारलं.

"क..काही नाही.... तिथे दूरवर त्या छोट्या डोंगराजवळ ना.. एक झाड आहे तिथे पाहत होतो" छोट्या दादुने मान खाली घालुन उत्तर दिलं.

"पण मी तुला सांगितलं होतं ना कि आपल्या दीदीशी खेळत बस" तिचा स्वर आता जरासा नम्र झालेला होता.

"तू पण तर बाहेर बघत होतीस दरवाजातून.. मी पण मग बाहेर पाहिलं" तक्रारीचा सूर काढत दादु खाली मान घालूनच बोलला.

"मी बाहेर पाहतेय ते आपल्या सुरक्षिततेसाठी आणि ..." पुढे तिला काय बोलावे ते समजेना कारण छोट्या दादूला ते समजले असते कि नाही हे तिला सांगता आलं नसतं. म्हणून मग ती गप्पच बसली.

तिच्या या अशा अचानक गप्प बसण्याने सोनू आणि दादु तिच्याकडे फक्त पाहत उभे होते. ती आणि तिची दोन मुलं एवढेच घरात होते. नवरा तर बाहेर गेलेला होता तो माघारी येईपर्यंत तिलाच सगळं घर आणि इतर गोष्टी सांभाळाव्या लागणार होत्या.

नवऱ्याच्या आठवणीने तिला मनातून उमाळा फुटला आणि ती काहीशी निशब्द झाली.

"आई... आई.. " सोनू तिचा पदर धरून ओढत तिला काहीतरी सांगत होती तेव्हा ती भानावर आली.

"अ..अं ..काय .."एवढंच ती म्हणाली.

"आई मला कसलातरी जळका वास येतोय. तिथे किचनजवळ गेलं कि.." सोनुने किचनकडे हात दाखवत तिला सांगितलं

"तुम्ही दोघे इथेच बसा मी आहे बाहेर.. मी बघते बाहेर.. कोणी आपल्याला काहीही करणार नाही .." तिने त्या दोघांना सांगितलं आणि बाहेर मुख्यदरवाजापाशी जाऊन परत एकदा बाहेरची चाहूल घेऊ लागली.

बाहेर थोडासा अंधार पडलेला होता. आजूबाजूला कोणीही दिसत नव्हतं. आसपास घरदेखील नव्हती. पण समोर जनावरांना बांधण्यासाठी एक खोपटं बनवलेलं होतं. त्याच्या बाजूला एक छोटीशी पाऊलवाट जी माळरानाच्या दिशेने जात होती.

तिची नजर त्या पाऊलवाटेच्या दिशेने पाहत होती. आसपास कसला आवाज येत नव्हता कि कसली हालचाल.

"आई.." तिच्यामागे परत एकदा सोनू उभी होती.

पण यावेळेस तिने मागे वळून न पाहता समोर दरवाजाच्या फटीमधूनच पाहतच तिला प्रत्युत्तर दिलं

"काय झालं सोनू ..तुला मी दादु सोबत आतमध्येच बसायला सांगितलं होतं"

"दादू बसलाय एकटा खेळत.. मी त्याला माझी बाहुली खेळायला दिलीय.." सोनू म्हणाली.

"बरं..मग तुही त्याच्यासोबत जाऊन का नाही खेळत आहेस" तिने मागे न वळता समोरची नजर तशीच ठेवून विचारलं.

"नको.. मला इथे तुझ्यासोबत थांबायचं आहे... आणि दादू एकटा छान खेळतोय आत.." सोनुने जराशा खालच्या आवाजात उत्तर दिलं.

त्यावर काहीही न बोलता बाहेर पाहत ती शांतपणे चाहूल घेत होती.

"बाबा कधी येणार आहेत परत...? मला खूपच विचित्र वाटतेय.. आणि तू सारखी बाहेर का पाहतेयस"? सोनुने पटापट प्रश्न विचारले.

सोनूच्या प्रश्नांवर तिच्याकडे निश्चित अशी उत्तरं नव्हती. त्यामुळे ती काहीच बोलली नाही. ती काहीच बोलत नाही म्हटल्यावर सोनू दरवाजाच्या जवळील खुर्चीत जाऊन विसावली.

खुर्चीत बसून सोनू किचनकडे पाहत होती तिथून येणारा तो जळका वास अजूनही तिच्या नाकात फिरत होता.

ती बाहेर पाहतच होती पण बाहेर कसलीही चाहूल तिला लागलेली नव्हती.

इतक्यात.. "आई.. आई.." हलक्या आवाजातल्या हाका आतल्या खोलीतून आल्या.

तिने आणि सोनुने दोघींनी एकदमच त्या आवाजाच्या दिशेने पाहिलं. आवाज आतल्या खोलीमधून येत होत्या. दोघीही पळतच त्या दिशेने गेल्या.

आतल्या खोलीमध्ये दादू परत एकदा खिडकीच्या फटीला डोळा लावून बाहेर पाहत होता आणि तशाच अवस्थेत आईला हाका मारत होता. तिने आतमध्ये येताच पाहिलं दादु खिडकीच्या फटीला नाक लावून बाहेर पाहतोय.

"दादू तुला किती वेळा सांगितलं रे बाहेर पाहू नकोस म्हणून..” पुढे ती काही बोलणार एवढ्यात दादु तिला काहीही न बोलू देता म्हणाला.

"आई आई.. त्या डोंगराजवळच्या झाडापाशी कोणीतरी आहे ..ते बघ ..इथेच पाहतेय ते" दादु त्याचे डोळे मोठे करत म्हणाला.

त्याच्या या बोलण्यावर सोनू भुवया वक्र करून त्याच्याकडे पाहू लागली. तीने मात्र पटकन दादुला त्या खिडकीपासून बाजूला केलं आणि स्वतः खिडकीजवळ जाऊन फटीला डोळा लावून बाहेर पाहिलं.

दूरवर एक छोटी टेकडी होती तिच्या मध्यभागी एक झाड होतं. अंधाऱ्या टेकडीवरच्या त्या झाडाजवळच एक आकृती उभी होती. जी घराकडेच पाहत असल्याप्रमाणे वाटत होती. लांबून ती आकृती स्त्री आहे कि पुरुष दिसत नव्हतं. कारण टेकडी जरा दूर होती. तिने डोळे बारीक करून त्या अंधाऱ्या भागाकडे पाहण्याचा प्रयत्न केला पण यश आलं नाही. थोडावेळ बाहेर पाहून ती परत सरळ उभी राहिली आणि तिने एकवार दादुकडे पाहिलं.

"कोण आहे ते आई.." दादुने तिला प्रश्न केला त्याच्या चेहऱ्यावर कमालीचं औत्सुक्य दिसत होतं.

"माहित नाही.." तिनं एवढंच उत्तर दिलं.

त्यावर कोणीच काहीही बोललं नाही.

काही वेळाने दादू म्हणाला "आई तो कालचा माणूस असेल का..?"

"नाही रे दादू ... कालचा माणूस तिथे त्या टेकडीजवळ का जाईल. तो असता तर आईने त्याला ओळखलं असतं ना" सोनुने दादुकडे पाहत उत्तर दिलं.

"का नसेल ...काल तो आपल्या घराकडेच पाहत उभा होता. आजसुद्धा तिथे लांब टेकडीवर जाऊन पाहत बसला असेल" दादुने आपले प्रश्न सोनूला विचारले.

"नाही दादु ... हे कोणीतरी वेगळंच आहे आणि ... आपल्याला त्याच्यापासून काही धोका आहे अस वाटतं नाही" तिने दादुच्या प्रश्नाचं समाधान केलं.

दादू आता विचारात पडला.

सोनू सुद्धा शांतपणे उभी राहिली होती. ती सुद्धा कसल्यातरी विचारात गुंगलेली होती. तेवढ्यात सोनू म्हणाली

"आई मला कोणाच्यातरी बोलण्याचा आवाज येतोय.."

"अं..." भानावर येत ती सोनूकडे पाहू लागली.

"कोणीतरी आहे घराजवळ" सोनुने आवंढा गिळून सांगितलं.

तसं तिने लगबगीने बाहेर पडत बाहेरच्या खोलीतील एका खिडकीजवळ जाऊन कानोसा घेतला. खरंच कोणीतरी बोलत होतं. तिने आपला एक कान खिडकीच्या जवळ नेऊन लावला आणि बाहेरचं बोलणं ऐकण्याच्या प्रयत्न करू लागली.

"अरे बाबा उठ आता. कितीवेळ झालं उठवतोय तुला." एकजण म्हणाला.

"न.. नाही नाही... मला आधी सांग उद्या सुद्धा माझ्यासोबत येणार आहेस तू.." दुसरा कसंबसं बोलला.

"उद्याच उद्या बघू.. आधी उठ आता.. जास्त झालीय तुला चालतासुद्धा येत नाहीये.." पहिला त्याला उठवण्याचा प्रयत्न करू लागला.

"नाही..आधी सांग उद्यापण येशील सोबत गुत्त्यावर.." दुसरा अजूनही जमिनीवर पडूनच बोलत होता.

दोघेही तिथेच घराजवळ संभाषण करत होते. ती आपला कान खिडकीला लावून ऐकतच होती.

"अरे उठ रे लवकर.. आजच कसंबसं बायकोला थाप मारून तुझ्यासोबत गुत्त्यावर जाता आलं. आता जास्त उशीर झाला तर तिला संशय येईल कि मी जादा काम करायला गेलेलो नसून गुत्त्यावर गेलो होतो.." पहिला त्याला विनवत होता.

"काय रे तू ...बायकोला घाबरतोस ...कसला असला नवरा तू तिचा..." पुढचे शब्द जीभ जाड झाल्याने दुसऱ्याला काही बोलता आले नाही.

पहिला काहीही न बोलता शांत बसलेला होता. दुसऱ्याची बडबड चालूच होती.

"ए..ए.. हे बघ आपण कुठे आलोय ..बघतोयस का हे घर" पहिला गंभीर आवाजात दुसऱ्याला म्हणाला.

"आ ...काय ...आ.." दुसरा तंद्रीतच बोलला.

"अरे हे बघ आपण कोणाच्या घरापाशी आलोय.." त्याच्या आवाजात अजूनही तीच गंभीरता होती.

तिने मात्र आता कान टवकारले. तिच्या शेजारी आत सोनूही येऊन उभी राहिली होती आणि खिडकीला कान देऊन ऐकू लागली होती.

"ती राहते ना इथे.. नवरा बाहेरच.." पहिला घराकडे पाहत म्हणाला.

"हा.. हो रे... या घरापाशी आलोय व्हय..हा आपण... हा तीच घर आहे कि हे..नवरा बाहेर कामाला आणि हि घरात एकटीच..." दुसरा शब्द अडखळत बोलला. तो अजूनही जमिनीवर बसून होता.

"एकटी नाही.. दोन पोरं पण आहेत. पण घर तर सगळीकडून बंद दिसतंय" पहिला घराकडे पाहत म्हणाला.

तिने आतून अजून जास्त जोर देऊन ऐकण्याचा प्रयत्न केला. सोनू आता खिडकीपासून बाजूला गेली आणि खोलीच्या दुसऱ्या कोपऱ्याकडे जाऊ लागली.

"काय मग.. जायचं का आत.. हा .." दुसरा अडखळत गालातल्या गालात हसत म्हणाला.

"कशाला.." पहिला हळू आवाजात म्हणाला.

"कशाला म्हणजे ...चल जरा पाहून येऊ आतमध्ये" छद्मी हसत दुसरा जमिनीवरच पडून बोलला.

"येडा झालाय का ..? आपल्याला आतमध्ये जाताना कोणी पाहिलं तर" पहिला इकडे तिकडे पाहत म्हणाला.

"अरे आसपास आसपास ...कोणीही.. ना ..नाहीये ..." दुसरा म्हणाला.

पहिल्याने त्याच्याकडे दुर्लक्ष केलं आणि जरासं दोन पावले पुढे जाऊन घराच्या मुख्यदरवाजाकडे टकं लावून पाहू लागला.

तसा टपकन एक दगड त्याच्या डोक्यामागे लागला.

"आऊ ..." डोके चोळतच पहिला मागे वळून पाहू लागला.

दुसरा अजूनही पहिल्याकडेच स्थिरपणे पाहत बसला होता.

"येडाय का रे तू.. दगड का मारलास" पहिला घुश्श्यात म्हणाला.

"मी..मी नाही मारला" दुसरा अजूनही स्थिरपणेच पाहत होता.

"चल उठ लवकर घरी जाऊयात...उगाचच काहीतरी" पहिला दुसऱ्याच्या मागे येऊन त्याला उठवू लागला.

तेवढ्यात एक छोटं लाकूड हवेतून भिरभिरत येऊन दुसऱ्याच्या पाठीत बसले.

"आई ग..." दुसरा कळवळला.

पहिला काहीसं हबकून जरा बाजूला झाला.

"माझ्या पाठीत मारतोय होय रे थांब. तुला ना ...बघतो आता" दुसरा आता भेलकांडत उठला आणि पहिल्याला मारायला धावला.

“अरे अरे.. नाही ..." असं म्हणत पहिला पुढे पळू लागला तर दुसरा त्याच्यामागे.. “थांब थांब तुला बघतोच” असं म्हणत एक दगड घेऊन मागे पळू लागला.

ती खिडकीजवळून बाजूला झाली आणि तिने सुटकेचा निःश्वास टाकला.

बरं झालं गेले ते नालायक. बेशरम लोकांना लाजा सुद्धा वाटत नाहीत दुसऱ्याच्या घराकडे पाहायला. स्वतःशीच पुटपुटत ती पुढच्या खोलीत आली.

तिच्या मागोमाग हसत हसत सोनू आली.

"कशी अद्दल घडवली त्या वाईट लोकांना" हसत हसत सोनू म्हणाली.

"हो दिसलं मला ते... दगड आणि काठी मारतेस लोकांना लपून... कोणी पाहिलं असतं तर.." ती करड्या आवाजात म्हणाली.

"अगं कोणीचं नव्हतं पाहणारं.. ते वाईट लोक होते ना म्हणून तसं केलं मी" सोनु आपली बाजू मांडत म्हणाली.

"हो..ते वाईट आणि त्यांना असं लपून छपून मारणारी तू.. सभ्य का?" तिच्या आवाजात अजूनही नाराजी होती.

सोनू काहीही न बोलता मान खाली घालून उभी राहिली.

"बरं जा आता आतमध्ये.. मी येथे थांबते जरा" ती म्हणाली.

"मी पण तुझ्याजवळ थांबते ना इथे... मला खूप वेगळंच वाटतंय.. बाबा कधी येणारेत" सोनु तक्रारीच्या स्वरात म्हणाली.

"येतील बाबा.. तोपर्यंत तू दादु जवळ जाऊन बस .." तिने सोनुला सांगितलं.

तसं काहीसं खट्टू होतं ती तेथून आतमध्ये निघून गेली.

ती परत एकदा दरवाजाजवळ आली आणि फटीतून बाहेर बघत एक चाहूल घेतली. बाहेर चांगलंच अंधारून आलेलं होतं. आसपास चिटपाखरूदेखील नव्हतं.

तिला जरासं हायसं वाटलं. दरवाजाजवळच्या खुर्चीतच ती विसावली.

नवऱ्याची वाट पाहत मुलांकडे लक्ष देणे यामध्येच तिने स्वतःला झोकून दिलं होतं. नवऱ्याने बाहेर जाताना सांगितलं होतं. नीट दारं खिडक्या लावून घे. मी आल्याशिवाय कोणालाही घरात घेऊ नकोस. लोकं चांगली नाहीत इथली.

नवऱ्याच्या आठवणीतच ती डोळे मिटुन खुर्चीत पडून होती. मधे किती वेळ गेला कोण जाणे. तिची पापणी उघडली ती कसल्याश्या धडधडण्याच्या आवाजानेच.

तिने डोळे उघडले आणि आसपास पाहिलं. तिला डुलकी लागली होती कि काय माहित नाही पण तिने स्वतःला सावरलं. मुलं आतमध्ये झोपली असावीत असा तिचा समज झाला.

परत धडधडण्याचा आवाज आला. समोरचं दार आणि बाजूच्या खिडक्या हवेच्या तडाख्याने आवाज करत होत्या. दारे आणि खिडक्या बंदच होत्या. पण हवा फटींमधून आतमधे यायला पाहत होती. त्यामुळे धडधड असा आवाज येत होता.

तिने सावकाशपणे दरवाज्याकडे पावलं टाकायला चालू केली. हवा काही प्रमाणात घरामधे घुसली होती. कारण सोनू मगापासून म्हणत असल्याप्रमाणे किचनमधुन येणार तो जळका दर्प आतील हवेसोबत सगळीकडे पसरला.

सावकाशपणे पावलं टाकतं ती दरवाजाच्याजवळ आली. फटींमधून बाहेर पाहायचं धाडस तिला होईना. तिच्या सर्वांगाला कापरं भरलं होतं. तरीही धीर एकवटून तिने हळूच एक डोळा फटीला लावला आणि बाहेर पाहण्याचा प्रयत्न केला. बाहेर चांगलाच अंधार पडलेला होता. रस्त्यावर कोणीही नव्हतं. रस्त्याच्या समोर एक दोन झाडे होती. बाजूला जनावरांना बांधण्यासाठी आणि त्यांच्या निवाऱ्यासाठी असलेलं एक खोपटं होतं. पुढे काही अंतरावर एक घर होतं. पण तिथे कसलाही प्रकाश नव्हता.

ती हळुवारपणे सगळीकडे नजर फिरवत होती. जनावरांच्या खोपटाच्या शेजारून एक पाऊलवाट वर माळरानाकडे जात होती. खोपटाच्या बाजूला अशी वाट असेल हे लांबून लक्षातही येत नसायचं. तिची नजर काही वेळ त्या

खोपटाच्या दिशेने वळली. पाऊलवाटेकडे एक सावली हलताना तिला दिसली आणि तिच्या काळजात धस्स झालं. तिथे कोणीतरी होतं तर..

श्वास रोखून ती पापणीहि न लवता त्या खोपटाच्या दिशेने पाहू लागली. सावली हळूहळू गडद होऊ लागलेली होती. तिचा उर धपापू लागला. खोपटाच्या बाजूला आता ती सावली पुढे येत स्पष्ट दिसू लागली.

भेसूर चेहरा, केस मोकळे, अंगावर काळपट राखाडी पोशाख, कृश शरीरयष्टी असलेली ती आकृती अनवाणी होऊन खोपटाच्या शेजारी चालत होती. चालता चालता ती आकृती जागीच थबकली आणि नाकाने फेंदारत काहीतरी हुंगू लागली. स्तब्ध उभी राहून इकडे तिकडे पाहत त्या आकृतीची नजर तिच्या घराकडे गेली आणि तिथेच स्थिरावली. मुख्यदरवाजाकडे पाहून त्या आकृतीने आपले शुभ्र दात विचकले जणू काही त्या आकृतीला दिसलं होतं कि आतमधून कोणीतरी बाहेर पाहतंय. तिचा चेहरा भयाने ग्रासून गेला. झटकन ती दरवाजापासून मागे झाली. तिचा श्वास वरखाली होऊ लागला.

तोच आहे तो... तोच कालचा माणूस.. सारखा इकडेच घराकडे पाहत होता. काय हवंय त्याला?

दरवाजापासून ती अशी काही बाजूला झाली जणू काही दरवाजामुळे तिला विजेचा झटका बसला असावा. सुन्न झाल्याप्रमाणे ती काही वेळ तशीच उभी होती. आतमध्ये जाऊन तिने मुलं काय करतायत ते पाहिलं. दोन्ही मुलं एकमेकांना बिलगून झोपलेली होती. मुलांकडे पाहून तिला हायसं वाटलं. त्या खोलीबाहेर येऊन तिने मुख्यदरवाजाच्या जवळ जाऊन हळूच डोळा लावून परत

बाहेर पाहिलं. बाहेर मगाशी होता तसाच मिट्ट काळोख होता. खोपटाशेजारच्या पाऊलवाटेकडे तिने घाबरत घाबरत पाहिलं. पण तिथे कोणीही नव्हतं.

टक टक टक... घराच्या मागच्या बाजूला आवाज येऊ लागला. जणू काही बोटांनी लाकडावर कोणीतरी आघात करत असावं. तिचा जीव घाबरा झाला. ती हळुवारपणे पण सावध पावले टाकतं मागे वळली. तो आवाज ठराविक पद्धतीत येतंच होता.

तिने हळूहळू घराच्या मागच्या बाजूकडे घरातून जात कानोसा घ्यायला सुरुवात केली. कोणीतरी त्या बाजूला नक्कीच होतं. तोच माणूस असावा का जो मगाशी पहिला होता याबाबत मात्र तिला खात्री न्हवती. सावकाशपणे ती मागच्या भिंतीला कान लावून उभी राहिली.

टक... बाहेरच्या बाजूला भिंतीवर कोणीतरी अगदी तिने जिथे कान लावलेला होता त्याच्याच मागे आवाज केलेला होता. दचकून ती मागे झाली. धपापता ऊर तिने हाताने दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. आवाज शांत झाला होता. मागच्या बाजूला जे कोणी होतं ते हळूहळू पुढे सरकत जात असल्यासारखं तिला वाटलं. पण आता टक टक आवाज येत नव्हता.

कोण असेल बाहेर याचा थांग लावणं आवश्यक होतं. कारण मुलांच्या सुरक्षिततेसाठी ते महत्वाचं होतं. स्वतः सावधपणे पावले उचलुन काहीतरी करणे आवश्यक होतं. मागे जे कोणी होतं ते हळूहळू पुढे जात असावं. कारण तिला तशी चाहूल लागली होती. ती पुढे झाली. मागच्या खोलीतील पडलेली काही लाकडे आणि जुनी कापडं गोळा केली. दुसऱ्या मागच्या खोलीला एक खिडकी होती जी तिने आतून बंद केलेली होती. तिथे जाऊन ती लाकडाला

कापड गुंडाळून स्वस्थ उभी राहिली. मागे जे कोणी होतं त्याची चाहूल आता खिडकीजवळ येऊ लागलेली होती. श्वास रोखून तिने ती मशाल खिडकीपुढे धरली. खिडकीसमोर ते येताच मशाल जाळून सरळ त्याच्या अंगावर फेकायचा निर्धार तिने केला होता. बाहेरची चाहूल खिडकीच्या पुढे येण्याआधी मागेच थांबली आणि कसल्यातरी पुटपुटण्याचा आवाज येऊ लागला.

संथ आवाजात आणि काहीतरी गूढ शब्दोच्चार करत असल्यासारखा तो आवाज होता..

ती आता घाबरू लागली लागली कारण ते शब्दोच्चार तिचं काळीज कापत असल्याप्रमाणे तिला वाटतं होते. कसाबसा धीर एकवटून ती खिडकीपुढे उभी होती. आपल्या इथे उभं राहण्याचा कयास तर बाहेर लागलेला नसेल ना? तिच्या मनात आलं.

बाहेर शब्दोच्चार आता पटापट होऊ लागले होते. तिच्या सर्वांगाला कंप जाणवू लागलेला होता. मनातून प्रचंड भीती जाणवत होती. हळूहळू बाहेरची चाहूल खिडकीपुढे सरकू लागली. तिने हात घट्ट आवळून लाकूड पकडलेलं होतं. एक एक क्षण तिला जाणवत होता. चाहूल आता पुढे पुढे सरकत होती. कधीही चाहूल आता बंद खिडकीपुढे येणार होती. ती तयार होती. काही क्षणात चाहूल बंद खिडकीच्या मागून तिला जाणवली.

तिने झटक्यात खिडकी उघडली. हातातली लाकूड आणि त्याला लावलेलं कापड पेटवलं. आगीचा एक लोळ खिडकीबाहेर पडला. लाकूड तिने बरोबर बाहेर सरकवलं होतं जेणेकरून बाहेर जे कोणी असेल त्याच्या सरळ

तोंडावरच जाईल. तिने ठरवल्याप्रमाणे आगीचा लोळ खिडकीबाहेर फेकला गेला.

बाहेर कोणाच्या तरी ओरडण्याचा आवाज आला. तिने लगबगीने खिडकीतून बाहेर पाहिलं. खाली जमिनीवर तोच मगाचा भेसूर दिसणारा माणूस पडलेला होता. मानेच्या भोवताली गुंडाळलेल्या कापडाला लागलेली आग हाताने विझवत होता. त्याला पाहताच तिचा पारा वर गेला. तिने शेजारच्या खोलीतील लाडके कापडाला गुंडाळून आणली आणि भसाभस आग लावून बाहेर टाकली. तो भेसूर दिसणारा माणूस अजूनही खाली पडून आग विझवण्याच्या प्रयत्नात असतानाच अजून आगीच्या ज्वाळा त्याच्या अंगावर पडल्या ज्यामुळे त्याच्या शरीराभोवती लक्तरं असल्याप्रमाणे दिसणाऱ्या कपड्यांना देखील आग लागली. घाबरून तो भेसूर चेहरा असलेला माणूस उठला आणि घरापासून लांब जाऊ लागला. आग त्याच्या शरीराभोवती लागल्याने ती हाताने झटकत तो पळत होता.

"मी येईन.. परत येईन आणि तुला घेऊनच जाईन ..." पळता पळता तो मधेच ओरडला.

ती मात्र समाधानाने हलकं स्मित करत खिडकीजवळ उभी राहून त्याच्या पळणाऱ्या आकृतीकडे बघत होती. अंधारात ते दृश्य खूपच विचित्र दिसत होतं. या सगळ्या गडबडीत सोनू आणि दादुसुद्धा झोपेतून उठून तिच्या मागे येऊन काय झालं हे बघू लागले. त्या भेसूर दिसणाऱ्या त्या माणसाची अशी त्रेधातिरपीट उडालेली पाहून दादू खळखळून हसला.

"कशी अद्दल घडली. आम्हाला त्रास देत होतास ना" असं म्हणत खुदुखुदू हसू लागला.

तिने मुलांना परत आतमधे खोलीत जायला सांगितलं आणि खिडकी बंद करून टाकली. सगळेजण आतल्या खोलीत शांतपणे बसलेले होते. ती आता बऱ्यापैकी निर्धास्त झालेली होती. सोनू आपल्या लाडक्या बाहुलीशी चाळा करत बसलेली होती. दादू उगाचच जमिनीवर लोळत होता. ती भिंतीला टेकून कसल्यातरी विचारात गढलेली होती.

"आई.. आता आपल्याला अजून कोणी त्रास देणार नाही ना?" सोनुने हलक्या आवाजात विचारलं.

"अं...ना... नाही" कसेबसे शब्द उच्चारात तिने उत्तर दिले आणि परत आपल्याच विचारात गढून गेली.

सोनुनेदेखील परत काहीही न विचारता शांतपणे बाहुलीशी खेळत मग्न झाली.

"दीदी तो वाईट माणूस येणार नाही ना आता" दादुने पडल्या पडल्याच आपल्या बहिणीला विचारलं. मगाशी सोनुने आईला जे उत्तर दिलं तेच उत्तर सोनू देते का हे त्याला पाहायचं होतं.

"नाही येणार दादु.. आत्ताच आई सुद्धा नाही म्हणाली ना" थोड्याश्या तिखट आवाजात सोनुने उत्तर दिले.

"मला नाही वाटत.." दादु सोनूला म्हणाला आणि आपल्या जागेवरून उठला.

"म्हणजे.." न समजून सोनू म्हणाली.

"सारखा सारखाच येतोय तो माणूस... आज आला तसा.. याआधी पण आला होता ना" दादु आता खिडकीच्या जवळ गेला. खिडकीच्या फटीला डोळा लावुन बाहेर पाहण्याची त्याची अतीव इच्छा झाली होती पण आई ओरडेल म्हणून फक्त तो खिडकीकडे पाहत उभा होता.

"आता नाही येणार तो.. कदाचित.." सोनुने आपलं वाक्य अर्धचं सोडलं. तिलासुद्धा पक्क ठाऊक नव्हतं कि उद्या परत तो माणूस येऊन त्रास देईल.

ती मात्र डोळे मिटून आपल्या मुलांचं संभाषण ऐकत भिंतीला टेकून बसलेली होती. दादुने हळूच तिरकसपणे तिच्याकडे पाहिलं. तिचं लक्ष नाहीये हे पाहून हळूच खिडकीबाहेर एकदा पाहून घ्यावं असा विचार त्याच्या मनात आला. सोनू मात्र जमिनीकडे पाहत विचारात पडली. आपल्याजवळील बाहुली तिने बाजूला ठेवली आणि दोन्ही गुडघे जवळ घेऊन त्यावर हनुवटी टेकवून शांत बसली. ती अजूनही तशीच भिंतीला टेकून शांतपणे बसून होती. दादू आता हळूच खिडकीच्या नजीक गेला.

"आई... तो माणूस परत येणार नाही ना किंवा अजून कोणी दुसरं..." सोनुने जमिनीकडे पाहतच विचारलं.

ती मात्र काहीही ना बोलता तशीच बसलेली होती. दादू जरा थांबला आणि त्याने आईकडे पाहिलं. ती काय बोलेल याची त्याला उत्सुकता होती पण ती काहीच प्रतिसाद देत नाही म्हटल्यावर तो परत खिडकीच्या जवळ सरकला. सोनू आता गुडघ्यात डोके घालून बसली होती. बाहेर कसलीही चाहूल नव्हती. पूर्ण शांत निर्मनुष्य काळोखी रात्रं होती.

तिने डोळे उघडून पाहिलं तर सोनू डोके गुडघ्यात घालून बसलेली होती. तिने सोनूला जवळ ओढलं आणि थोपटलं. दादू खिडकीतून बाहेर पाहत असलेला पाहून सुद्धा ती त्याला काहीही बोलली नाही.

काहीवेळाने दादू म्हणाला "आई... इकडे बघ ना.. खूप सारी लोकं दिसतायत आता"

तिने आणि सोनुने दादुकडे पाहिलं. तिने सोनूला बाजूला केलं आणि जागेवरून उठून खिडकीजवळ गेली. दादु लगेच बाजूला झाला. खिडकीच्या फटीला डोळा लावून तिने बाहेर दूरवर दिसणाऱ्या टेकडीकडे पाहिलं. टेकडीच्या मध्यभागी असणाऱ्या झाडाजवळ आता बऱ्याच लोकांचा घोळका दिसत होत्या. लांबवर धुरकट वातावरण असल्याने स्पष्ट दिसतं नव्हतं पण तिथे आसपास जमा झालेली गर्दी मात्र दिसत होती.

ती खिडकीपासून बाजूला झाली आणि कसल्यातरी विचारात पडली. ती बाजूला होताच दादु लगेचच खिडकीच्या जवळ गेला आणि बाहेर पाहू लागला. सोनू किलकिल्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहू लागली.

"आपल्याला तिथे जायला हवं आता" तिने आपल्याच विचारात शब्द उच्चारले. दादू आणि सोनू तिच्याचकडे पाहू लागले.

दोन्ही मुले आपल्याकडे पाहत आहेत हे पाहून ती परत म्हणाली "हो, आपण जाऊयात इथून"

"आणि बाबा परत आले तर..आपण इथे दिसणार नाही त्यांना" सोनुने विचारलं.

"बाबा नक्कीच तिथे असणार.." दादू खिडकीच्या फटीतून बाहेर पाहतच म्हणाला.

सोनुने भुवया वक्र करून दादुकडे पाहिलं. तिने भिंतीचा आधार घेऊन आपलं डोकं त्यावर टेकवलं. कदाचित ती थकली होती कि तिला तंद्री लागली होती.

"तिथे बाबा दिसलेत का तुला" सोनू जागेवरून उठून म्हणाली.

"ना.. दिसत नाहीये कोणी.. पण असतीलच कि तिथे.." दादु समोरची नजर न हटवता म्हणाला.

यावर सोनू काहीही न बोलता तशीच प्रश्नार्थक मुद्रा करून उभी राहिली.

"चला दादु बाजूला व्हा आता तिथून, सोनू त्याला घेऊन बाहेर थांब जा" अचानक तंद्रीतून बाहेर आल्यासारखी ती पटापट बोलली. तिच्या त्या बोलण्यामुळे दादू पटकन सोनूजवळ गेला. सोनूसुद्धा काहीहि बोलता दादूचा हात पकडून त्याच्यासोबत बाहेर गेली.

मुलं गेल्यावर तिने पटकन समोरच्या खिडकीला डोळा लावला. बाहेर पाहिलं तर काळोख जरा ओसरत होता. टेकडीवरच्या माणसांचा घोळका आता जलदगतीने झाडाभोवती फिरत होता. तिने घराच्या आसपासच्या परिसरात नजर फिरवली काळोख कमी झाल्यासारखं जाणवत होतं. कदाचित पहिला प्रहार चालू झाला असावा. तिने मनाशी निश्चय केला आणि बाहेरच्या खोलीत आली. सोनू आणि दादू मुख्यदरवाजाजवळच उभे होते.

"चला थोड्या वेळात निघुयात हा आपण आता. बाबा आता तिथेच येतील." समजुतीच्या सुरात तिने दोन्ही मुलांना सांगितलं. थोडा वेळ तिथेच थांबून परत मुख्य दरवाजाच्या फटीला डोळा लावून बाहेरची चाहूल घेतली. खरंच काळोख कमी झाला होता आणि बाहेर कोणीही नव्हतं. बाहेर कोणिहि नाही हे पाहून ती मुलांसोबत बाहेर पडली.

दादूला तिने आपल्या कडेवर घेतलं होतं आणि सोनुने तिचा हात पकडला होता. अडखळत ती पुढे पुढे सरकत होती. चालायला तिला तसा त्रासच होत होता. घराच्या पुढच्या दोन रिकाम्या जागा ओलांडून ती पुढे आली.

पुढच्याच एका वळणावर एक इसम कोणाची तरी वाट पाहत होता. ती मात्र शांतपणे चालत होती. सोनूसुद्धा पाय ओढत तिच्यासोबत चालत होती. दादू मस्तपैकी अंगठा चोखत तिच्या खांद्यावर डोके ठेवून इकडे तिकडे पाहत होता. वळणवरचा इसम कोणा तरी ओळखीच्या माणसाची वाट पाहत उभा होता. थोड्याच वेळात एक प्रवासी वाहतूक करणारी एक रिक्षा तिथे आली आतून एक माणूस उतरला. वाट पाहणाऱ्या इसमाने त्याला ओळखले आणि त्याची गळाभेट घेतली.

दोघेही मग रस्त्यावरून चालू लागले. ती एका झाडामागे काहीवेळ उभी राहिली जेणेकरून त्या दोघांची तिच्यावर नजर पडू नये.

"बऱ्याच दिवसांनी आलास" वाट पाहणाऱ्याने विचारलं.

"हो हो..खूप काळ लोटला. कामामुळे जमलंच नाही" त्या पाहुण्याने उत्तर दिलं. ख्याली खुशाली विचारून ते दोघे आता तिच्या घराजवळ आले.

"अरे हे तर वसंतचे घर.. असे ओसाड... आणि जळून कशाने गेले" पाहुण्याने विचारलं. त्या वाक्यसरशी तिने त्या दोघांचा कानोसा घेतला.

दुसऱ्याने त्या घराकडे पाहत उसासा टाकला आणि म्हणाला "काही दिवसांपूर्वी अचानक आग लागली घराला. किचनमध्ये कदाचित सिलिंडरचा स्फोट झाला असं लोकं म्हणतात. वसंता कामामुळे बाहेर होता पण त्याची बायका पोरं मात्र आगीमध्ये दगावली.

"अरेरे... काय हे दुर्दैव... मागच्या वेळेस आलो होती तेव्हा दिसलं होतं हे कुटुंब. दैवाने कसा घाला घातला असा" पाहुण्याने हळहळ व्यक्त केली.

"हो... दुर्दैवच.. ४ तासाने आग आटोक्यात आली. सगळे जळून गेले होते. नंतर कोणीतरी वसंताला निरोप देऊन सांगितलं तर घाईगडबडीत येण्याच्या नादात त्याच्या वाहनाला अपघात झाला आणि तो सुद्धा जागीच गेला.''

"हाय रे दैवा" पाहुणा आता जास्तच हळहळला. झाडामागची ‘‘ती’’ मुलांसोबत कानोसा घेत तिथेच उभी होती.

"नंतर काही दिवसांनी रात्री गावातील लोकांना इथे आसपास जरा वेगळ्याच हालचाली जाणवल्या. जळक्या घरात खिडकीपाशी कोणीतरी लहान मुल उभं आहे असं दिसायचं. दरवाजाजवळ आवाज यायचा. खिडकीमधे पेटते पलिते दिसायचे काहींना.. रात्री अपरात्री इथे यायला लोक घाबरायला लागले." माणसाने माहिती पुरवली.

"बापरे काय सांगतोस काय ...तू पाहिलंस ते" पाहुणा घाबरून बोलला.

"नाही.. लोक सांगतात ते फक्त सांगतोय. नंतर गावप्रमुखांनी अपरात्री येथे भटकायला बंदी केली लोकांना. काही मांत्रिक या गोष्टीचा फायदा घेऊन आपलं कुकर्म करायला रात्रीचे इथे घिरट्या घालू लागलेत" त्याने सांगितलं.

"शी काय पण लोक ते" पाहुणा बोलला.

"जाऊदेत चल पटकन इथून पुढे जाऊयात लगबगीने. इथे कोणीतरी पाहिलं आणि हटकेल उगाचच. सकाळ होऊ लागलीये आता घराकडे जाऊ" त्याने पाहुण्याला ओढतच तिथून नेलं.

ती झाडामागून बाहेर आली आणि एक शेवटची नजर तिने आपल्या जळालेल्या घराकडे टाकली आणि परत हवेतूनच तरंगत सोनूला पकडून पुढे जाऊ लागली. टेकडीवरच्या माणसांच्या आकृत्या आता स्पष्ट दिसू लागल्या होत्या. हवेत तरंगतच त्यांनी झाडाभोवती फेर धरला होता.

"ते बघ बाबा..." सोनू ओरडली. दादू समोर पाहू लागला आणि हर्षोल्हासित होऊन चित्कारला.

टेकडीवर एक काळी आकृती हात पसरून त्यांच्याकडे पाहत त्यांना बोलावत होती.

"तिने" सुद्धा त्या आकृतीला ओळखले आणि आनंदाने ती भराभर हवेत तरंगत पुढे जाऊ लागली. आता ती सुरक्षीत होती. आत तिला आणि तिच्या मुलांना कोणीही त्रास देऊ शकणार नव्हतं. कारण ती आत आपल्यासारख्या लोकांसोबत असणार होती.

==========

खोली क्रमांक ४

"अरे नुसता बसलायस काय आतमधे. जरा बाहेर येऊन धक्का मार" अजय वैतागत म्हणाला.

"काय..." कानामध्ये हेडफोन्स घातलेले असल्याने टोनीला नीट ऐकू गेलं नाही.

अजयच्या ते लक्षात आलं. तसं त्याने गाडीच्या मागून चालत येत पुढे बसलेल्या टोनीच्या कानातले हेडफोन्स काढून ते मागच्या सीटवर फेकले.

"गधड्या खाली उतर आणि धक्का मार. त्या दोघीच धक्का मारत आहेत" अजय जरा नरमाईत बोलत गाडीच्या मागे धक्का मारायला गेला. नाईलाजानेच टोनी गाडीमधून उतरला आणि गाडीला धक्का मारायला मागे गेला.

"आलास का? बरं झालं.. आता तू जरा धक्का मार अजयसोबत. मी दमलेय." असं म्हणत माधुरी गाडीच्या बाजूला उभी राहून घाम टिपू लागली.

"टोनी तू इथे मधे ये आणि गाडीच्या बरोब्बर मागून धक्का मार. तुझ्यात ताकद जास्त आहे. मी आणि अजय बाजूने धक्का मारतो" घामाने निथळणारी अपूर्वा टोनीला म्हणाली. तसं टोनी आज्ञाधारकपणे गाडीला धक्का मारायला

लागला. तिघेही धक्का मारत होते आणि त्यांची बंद पडलेली गाडी हळूहळू पुढे सरकत होती. मागून माधुरी आपल्या जवळील मोठ्या रुमालसदृश कापडाने आपले डोके झाकुन त्यांच्यामागोमाग चालत होती. ऊन जास्त नसलं तरीसुद्धा दमल्यामुळे सगळेच घामाघूम झालेले होते.

अजय, माधुरी, टोनी आणि अपूर्वा चौघांची कॉलेजपासूनची घट्ट मैत्री. कॉलेजमधील सगळी वर्षे या चौघांनी जवजवळ सोबतच अनुभवली. लेक्चर्स, प्रॅक्टिकल, विविध कलागुणांचे समारंभ, गॅदरिंग सगळ्यांमध्ये चौघे एकत्रच सहभाग घ्यायचे. नंतर पुढे परीक्षा संपल्या आणि सोबतच कॉलेजसुद्धा.

आता आयुष्यात पुढच्या प्रवासात कोण कुठल्या क्षेत्रात जाणार हे माहित नसल्याने आणि परत कॉलेजमधे सर्रास भेटीगाठी व्हायच्या तशा होतील कि नाही हे माहित नसल्याने चौघेही कुठेतरी मस्तपैकी फिरून यावे या इराद्याने गाडी घेऊन बाहेर पडले होते. कुठे फिरावं याबाबत त्यांनी चर्चाविमर्श केला. समुद्रकिनारा, प्राचीन मंदिरे आणि शहरी ठिकाणांना आधीच सगळ्यांनी भेटी दिलेल्या होत्या म्हणून असं ठरलं कि अशा ठिकाणी जाऊ जिथे चौंघांपैकी कोणीही आत्तापर्यंत गेलेले नसेल.

बाणेरीचा डोंगर या ठिकाणी ट्रेकिंगचा अनुभव घ्यावा असं सर्वानुमते ठरलं. अजय आणि माधुरी भलतेच खूष होते कारण डोंगरदऱ्या आणि निसर्गरम्य वातावरणात फिरायला त्यांना नेहमीच आवडे. बाणेरीच्या डोंगराकडे जाणारा रस्ता काहीसा जंगलभागातुन जाणारा होता त्यामुळे अजय आणि माधुरीला या ट्रिपचं जास्त आकर्षण वाटतं होतं. अपूर्वाला निसर्गरम्य वातावरणापेक्षा डोंगर चढाई करण्यात जास्त रस होता. तशीही ती जराशी गंभीर आणि धाडसी स्वभावाची होती. इतर मुलींसारखा सोशिक आणि भिडस्त

स्वभाव तिच्या शरीरात नव्हताच जणू. भीडभाड न बाळगता बोलणे हा तिचा स्वभावधर्मच. टोनीला आपल्या या मित्रमैत्रिणींसोबत फिरायला आवडे. परत भेट होईल कि नाही म्हणून तो या सगळ्यांसोबत आलेला होता. डोंगरदऱ्यांवरची चढाई वा जंगलामधला निसर्गरम्य परिसर यापेक्षा तो संगीतामधे जास्त रमे. या प्रवासात सुद्धा त्याने त्याचे हेडफोन्स जवळ बाळगलेले होते.

ठरल्याप्रमाणे चौघे आपल्या गाडीमधून बाणेरीच्या डोंगराकडे जावयास निघाले होते. मस्तपैकी हसत खेळत, थट्टा मस्करी करत ते चाललेले असतानाच अचानक रस्त्यात त्यांची गाडी बंद पडली. आनंदाच्या क्षणात काय मधेच अरिष्ट कोसळलं असं वाटून सगळे गाडीमधून उतरून गाडी का बंद पडली हे पाहू लागले. गाडीचे सगळे टायर्स व्यवस्थित होते पण इंजिनाच्या बाजूने हलकासा धूर येत होता. इंजिनच्या भागात काही अडचण असल्याचे त्यांच्या लक्षात आले. रस्त्यावर माणसांची जास्त वर्दळ नव्हती आणि आसपास कुठे गॅरेज सुद्धा दिसत नव्हतं. मागून येणाऱ्या एका गाडीला त्यांनी हात केला तर त्यातील माणूस म्हणाला पुढे काही अंतरावर गॅरेज आहे. त्यामुळे जास्त नाराज न होता काही अंतर गाडी ढकलत जावे असा विचार त्यांनी केला. बाणेरीचा डोंगर त्यांच्या दृष्टीक्षेपात आलेला होता पण काही अंतर अजून जावं लागणार होतं. तसंही त्यांना कसलीही घाईगडबड नव्हती. कॉलेज संपलेले होते आणि फिरण्यासाठीच म्हणूनच ते बाहेर पडलेले होते म्हणून गाडी बंद पडल्याने त्यांच्या उत्साहावर जास्त काही परिणाम झालेला नव्हता.

"अजून किती लांब आहे गॅरेज" गाडी ढकलतच असताना टोनीचा खरखरीत स्वर आला.

"जास्त लांब नाहीये, पुढे ते मोठ्ठ झाड दिसत आहे ना? तिथेच आहे वाटतं" अजयचा थकलेला आवाज आला.

"अरे काही वेळच झाले तुला गाडी ढकलून तर लगेचच वैतागलास का? ती माधुरी बघ मागापासून धक्का देत होती. मुलगी असूनपण जास्त तक्रार केली नाही तिने. आणि तू एवढा हट्टाकट्टा आहेस सगळ्यांपेक्षा आणि कंटाळलास होय रे शुंभा?" अपूर्वा आपल्या नेहमीच्याच रोखठोक स्वभावात बोलली.

"कंटाळलो नाहीये गं..किती लांब आहे ते विचारलं फक्त" टोनी म्हणाला.

"तर तर.. दिसतंय कि तुझ्या चेहऱ्यावरून किती त्रास होतोय तुला ते" अपूर्वा आता त्याला उगाचच कचाट्यात पकडत होती.

दोघेही एकमेकांना उत्तर प्रत्युत्तर देत होते. यामधे अजय आपला सहभाग न दाखवता गाडीला धक्का देत होता आणि मधेच मागून डोक्यावर कापडं टाकलेल्या माधुरीला ती मागेच चालत आहे ना म्हणून लक्ष देत होता. माधुरी आपली इकडे तिकडे पाहत रस्त्यावरून चालत होती. आजूबाजूला झाडे होती पण काहीसा मोकळा मैदानी भागसुद्धा होता. पुढे काही मिनिटांच्या अंतरावर बाणेरीचा डोंगर दिसत होता. डोंगराच्या पायथ्याला जंगलभाग दिसत होता. जंगलभाग चालू होण्याआधी रस्त्यावर काही हॉटेल्स आणि टपऱ्या दिसत होत्या.

"मला वाटतं समोर टपरीवजा काहीसं दिसतंय. ते गॅरेज असावं" माधुरी समोर पाहत बोलली.

तिच्या या वाक्यासरशी अजयने समोर पाहिलं आणि "हम्म.. दिसतंय खरं.." असं म्हणाला.

"चला मग पटापट धक्का द्या. लगेचच पोहोचू तिथे. माधुरी तू पण ये ग" अपूर्वा म्हणाली.

तसं माधुरीसुद्धा त्या तिघांसोबत गाडीला धक्का देऊ लागली. काही मिनिटातच ते त्या टपरीवजा खोपटापाशी येऊन पोहोचले. गाडीला बाजूला लावून त्यांनी त्या खोपटाकडे पाहिलं आणि सगळ्यांचीच निराशा झाली. कारण ते गॅरेजच होतं पण त्याच्या लोखंडी दरवाजाला भलं मोठं कुलूप होतं.

"बोंबला... आता काय करायचं. गॅरेज तर बंद आहे" टोनी अस्वस्थ मनाने म्हणाला आणि गाडीच्या मागच्या सीटवरून आपले हेडफोन्स घेऊ लागला.

"अरे यार.. आसपास दुसरं गॅरेज देखील दिसत नाहीये." अजयने आपला त्रागा व्यक्त केला.

अपुर्वासुद्धा चरफडत गाडीच्या बॉनेटवर जाऊन बसली.

"तिथे बाजूला एक हॉटेल दिसतंय तिथे विचारून येउयात का? कदाचित हॉटेलमालक दुसरा गॅरेजवाला कुठे मिळेल हे सांगेल किंवा दुसरा काहीतरी पर्याय देईल तो" माधुरी समोर पाहत म्हणाली.

खोपटाच्यापुढे गेल्यावर रस्त्याच्या विरुद्ध बाजूला एक दुमजली हॉटेल होतं. लांबून लक्षातही येत नव्हतं. कारण त्याच्या आसपास काहीशी झाडांची गर्दी होती. हॉटेलच्या शोभीकरणासाठी लागतात तशी झाडेसुद्धा दिसत होती.

"कल्पना चांगली आहे. चल माझ्यासोबत लगेचच जाऊन येउयात. मुलांनो तुम्ही इथेच थांबा आम्ही हॉटेलमधे जाऊन चौकशी करून येतो" अपूर्वा माधुरीला म्हणाली आणि लगोलग पुढे चालूसुद्धा लागली.

माधुरीसुद्धा काहीही न बोलता अपूर्वाच्या मागोमाग गेली.

गाडीजवळ आता अजय आणि टोनीच होते. अजय आसपासचा परिसर न्याहाळत होता. गॅरेजच्या बाजूलाच गाडी पार्किंगला लावतात तसे काही शेड्स होते. त्याच्यामागे फुलझाडांची शेती असावी कारण ती रोपे मस्तपैकी हवेत डोलत होती. सूर्य आता उतरणीला लागलेला होता. टोनी गाडीजवळच उभं राहून कानात हेडफोन्स लावून काहीतरी ऐकत मान डोलवत होता.

अजय चालत चालत पार्किंगसाठी लावलेल्या शेडच्या जवळ आला. तिथून खोपटाच्या मागचा भाग दिसत होता. खोपटाच्या मागे जरा मोकळी जागा होती आणि तिथे एक पांढऱ्या रंगाची गाडी लावलेली होती. अजयला अचानक त्या गाडीचं तिथे असण्याचं आश्चर्य वाटलं. कारण गाडीवर धूळ होती आणि गाडी बरेच दिवस वापरात नसल्यासारखी दिसत होती.

अजय गाडीच्या जवळ जाऊन गाडीचं निरीक्षण करू लागला. गाडी खूप चांगल्या स्थितीत होती. गाडीला कसलाही ओरखडा किंवा अपघाती खुणा दिसत नव्हत्या. तरीपण या गॅरेजच्यामागे हि गाडी अशी का उभी असावी याचं राहून राहून अजयला आश्चर्य वाटत होतं. पुढच्या भागाचं निरीक्षण करून अजय गाडीच्या मागच्या भागाकडे आला. गाडी सगळ्या बाजूंनी व्यवस्थित दिसत होती. अजयने मागूनच मागचे सीट्स आणि आतल्या भागांकडे पाहिलं आणि हळूहळू त्याची नजर ड्राइव्हर सीटच्या समोरील आरशाकडे जो मागची वाहने पाहण्यासाठी असतो तेथे गेली आणि क्षणभर तो दचकलाच ...

कारण त्या आरशात त्याला कोणत्यातरी व्यक्तीचे डोळे जे त्याच्याचकडे पाहत होते हे दिसलं. पण दुसऱ्याच क्षणाला ते डोळे गायब होऊन परत तिथे साधारण आरसा दिसला.

अजयला क्षणभर आपल्या डोळ्यावर विश्वासच बसला नाही कारण जे घडलं ते एवढं क्षणार्धात घडलं कि आपण जे पाहिलं ते सत्य होतं कि भास हेच त्याला समजेना. या धूळ खात पडलेल्या जुन्या गाडीमधे कोणीतरी बसले आहे असं वाटणं हा भास होता हे त्याच्या मेंदूला समजायला काही अवधी गेला. अचानक गॅरेजवजा खोपटाच्या पुढच्या बाजूने त्याला अपूर्वा आणि टोनीचा आवाज ऐकू आला. तो पटकन तिथून माघारी गॅरेजच्या पुढे आला.

"अगं अजून थोडं पुढे गेल्यावर आपल्याला गॅरेज नक्कीच मिळेल" टोनी म्हणाला.

"अरे पण तो हॉटेलमालक म्हणालाय ना कि उद्या हा गॅरेजवाला येईल. तेव्हा तुमची गाडी दुरुस्त करून देईल तो" अपूर्वा त्याला समजावत बोलली.

माधुरी शांतपणे त्या दोघांकडे पाहत उभी होती. अजय तिच्या बाजूला उभा राहिला आणि माधुरीकडे 'काय झालं' अशा अर्थाने हातवारे केले.

त्यावर माधुरी शांतपणे म्हणाली कि "हॉटेलमालक म्हणतोय कि गॅरेजवाला उद्या येईल. तोपर्यंत आजची रात्र हॉटेलवर रहा आणि उद्या सकाळी गॅरेजवाला आला कि गाडी दुरुस्त करून जा".

"चांगलंय ना मग.. असंही आता संध्याकाळ होत आलीय. पुढचा रस्ता आपल्या ओळखीचा नाहीये. आजची रात्र त्या हॉटेलमधे काढणं श्रेयस्करचं आहे" अजय माधुरीच्या वाक्यावर दुजोरा देत म्हणाला.

"हो.. पण टोनी म्हणतोय अजून पुढे गेल्यावर आपल्याला कुठेतरी गॅरेज मिळेल आणि हॉटेल मालक उगाचंच गिऱ्हाईक मिळेल या स्वार्थीभावनेनं रहा

म्हणतोय आणि अपूर्वा त्याला समजावून सांगतेय" माधुरी कपाळावर आठ्या पाडत म्हणाली.

यावर अजय काहीही न बोलता अपूर्वा आणि टोनीचा वाद पाहत उभा होता. दोघेही आपापल्या गोष्टीवर ठाम होते. अखेर त्या दोघांमधे एकमत होईना म्हणून मग अजय त्यांच्यामधे पडला.

"एक मिनिट थांबा दोघेही" अजय बोलला. त्याच्या आवाजासरशी अपूर्वा आणि टोनी बोलायचे थांबले आणि अजयकडे पाहू लागले.

"संध्याकाळ झालेली आहे. इथे अनोळखी भागात आपल्याला कोणीही आसरा देईल असं वाटतं नाही. उगाचंच रिस्क घेऊन थकलेलं शरीर घेऊन पुढे गाडी ढकलत जाण्यापेक्षा आजची रात्र इथेच त्या हॉटेलवर काढू खाऊ,पिऊ,आराम करू. उद्या हा गॅरेजवाला येईलच तेव्हा गाडीची दुरुस्ती करू आणि पुढे डोंगराकडे जाऊयात." असं बोलून अजय त्या दोघांकडे पाहू लागला.

त्या दोघांनाही अजयचा मुद्दा पटला होता. टोनीला सुद्धा अजयचं म्हणणं पटलं.

अपूर्वातर माधुरीसोबत पुढे निघून त्या समोरच्या हॉटेलकडे चाललीसुद्धा. अजयसुद्धा टोनीसोबत गाडीला धक्का मारत त्या हॉटेलच्या जवळ येऊन पोहोचला. दोघांनी गाडी हॉटेलच्या पार्किंगमधे उभी केली. अपूर्वा माधुरीसोबत हॉटेलच्या रिसेप्शनवर हॉटेलमालकासोबत काहीतरी बोलत होती. हॉटेल हे जास्त मोठे नव्हते वा लहान देखील नव्हते. एका जुन्या बंगल्याचे रूपांतर हॉटेलमधे केल्याप्रमाणे ते हॉटेल वाटत होते. प्रवेशद्वारापाशी असणारी सुशोभित बाग वगळता काहीही नूतनीकरण दिसत नव्हते.

"अरे या.. या... आलात तुम्ही तुमच्या सगळ्या मित्रांसोबत..या तुमचं स्वागत करतो" जरासं पोट पुढे आलेला, डोक्यावर मध्यभागी टक्कल आणि डोळ्यावर चष्मा असा रिसेप्शनवरचा माणूस जो त्या हॉटेलचा मालकदेखील होता तो अपूर्वाकडे पाहून बोलला. मगाशीच अपूर्वाने या हॉटेलमालकाला आमची अवस्था यथासांग वर्णन करून सांगितली होती.

"अरे किशन यांचं सामान खाली लगेजरूममधे ठेवुन दे" हॉटेलमालकाने त्याच्या कामगाराला आदेश सोडला. तसा किशन नावाचा खुरट्या दाढीचा मध्यमवयीन इसम आमचं सगळं सामान एक एक करून खालीच असणाऱ्या लगेजरूममधे ठेवू लागला.

"काका आम्हाला दोन रूम्स हव्यात. एक मुलांसाठी आणि एक मुलींसाठी" अपूर्वा हॉटेलमालकाला म्हणाली.

"बेटा एकचं रूम अव्हेलेबल आहे" चष्मा सावरत आणि हसत हॉटेलमालक म्हणाला,

"ओह्ह.. असं कसं काय.. काही अड्जस्ट नाही का होणार?" अपूर्वा मधाळ आवाजात म्हणाली.

"अवघड आहे बेटा.. काय आहे कि.. एकूण ५ रूम्स आहेत. त्यातील खोली क्रमांक १ मधे एक माणूस आहे. खोली क्रमांक २ मधे एक कपल आहे जे बाहेर गेलंय. खोली क्र. ३ पेस्ट कन्ट्रोल करण्यासाठी बंद केलीय. खोली क्रमांक ५ तुम्हाला मिळेल. मोठी पण आहे आणि तिथे २ बेड आहेत" हॉटेलमालक पटापट माहिती देत बोलला.

"ठीक आहे. मग अड्जस्ट करूयात. तसंही थांबावं तर लागणारच आहे" अपूर्वा दुसरं वाक्य आपल्या मित्रांकडे पाहत हळूच म्हणाली. या सगळ्या संभाषणात अजय, माधुरी आणि टोनी फक्त ऐकण्याची भूमिका बजावत होते. कारण बोलण्याचं काम तसंही अपूर्वाच करायची. वर जाऊन खोल्या पाहुन तरी येऊयात असा विचार करून अजय आणि माधुरी बाजूच्या जिन्यावरून वरच्या मजल्यावर जिथे खोल्या होत्या तिथे निघाले. अपूर्वा आपलं फ्रेश होण्याचं सामान बॅगेतून काढण्यासाठी लगेजरूमकडे वळली.

"काका.. पण खोली क्रमांक 4 अव्हेलेबल आहे कि नाही हे सांगितलेच नाही तुम्ही" इतका वेळ शांत असलेला टोनी हॉटेलमालकाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहत म्हणाला. त्याच्या या वाक्यावर अजय आणि माधुरी वर जिन्याकडे जातानाच मधेच थांबले आणि काकांकडे पाहू लागले. अपूर्वासुद्धा आतल्या लगेजरूमकडे जाताजाता मागे वळून पाहू लागली.

टोनीच्या या प्रश्नावर हॉटेलमालक काहीसा शांत बसला. त्याच्या टकलावर थोडेसे घामाचे बिंदु जमा झाले. खिशातून रुमाल काढून त्याने टकलावरून फिरवला.

"ती खोली बंद आहे बेटा" काहीसं हसत मालक म्हणाला.

"का बरं" टोनी परत बोलला.

काहीसं शांत बसून नंतर हॉटेलमालक म्हणाला "ते.. खोलीत जरा दुरुस्तीचं काम बाकी आहे. कपाटे जुनी झालीत, बेड दुरुस्त करायचाय"

त्याच्या या उत्तरावर कोणीच काही बोललं नाही.

सगळेजण आपापल्या मार्गाला निघून गेले. अजय आणि माधुरी वरच्या मजल्यावर सगळ्या खोल्या पाहत फिरत होते. त्यांची खोली क्रमांक ५ हि अगदी टोकाला होती. ते ज्या खोलीमधे थांबलेले होते तिथे दोन बेड होते. खोली बऱ्यापैकी मोठी होती. हॉटेलला जास्त खोल्या नव्हत्या याचं दोघांनाही आश्चर्य वाटलं. वरच्या मजल्यावर मोठा पॅसेज होता आणि ठराविक अंतरावर रूम्स होत्या. ते दोघेही ५ क्रमांकाच्या खोलीत जाऊन पाहून लागले. सगळं सामान व्यवस्थित होतं. फक्त बेड २ होते आणि त्यामुळे साहजिकच अजय आणि टोनीला खाली जमिनीवर झोपावं लागणार होतं म्हणजे दोन मुलींना बेडवर झोपता येईल.

"वाह.. एका रात्रीची सोय होण्यापुरती छान खोली आहे." अजय खिडकीकडे जात म्हणाला.

"हो पण.. तुम्हा दोघांना खाली झोपावं लागेल याची खंत वाटतेय. आपण रात्री जागा बदलूयात मी खाली झोपते. तू बेडवर झोप नंतर" माधुरी काळजीच्या स्वरात म्हणाली.

"अरे सोड ना यार.. त्यात काय मोठं.. एका रात्रीचा तर प्रश्न आहे. करेन अड्जस्ट" अजय तिची समजूत घालत म्हणाला.

माधुरीला आपण मुलगी आहोत म्हणून असं सवलत घेणं कधीच पसंत नसायचं. अजयला तरीसुद्धा तिने आपली काळजी दाखवत परत रात्री जागा बदलण्याविषयी सांगितलं. पण अजयने तिला दाद दिली नाही.

"एकच खोली अव्हेलेबल आहे म्हणून हा घोळ आहे. ना जाणो शेजारच्या खोली क्रमांक ४ मधे कसली दुरुस्ती चालू आहे. एका रात्रीपुरतं तिथे

झोपता आलं असतं तर आपली गैरसोय टळली असती" माधुरी विचार करत म्हणाली.

"हो.. पण हॉटेलमालक म्हणालाय ना कि तिथे दुरुस्तीचं काम बाकी आहे" अजय म्हणाला आणि बेडवर आडवा पडला.

"देव जाणे काय सुरु आहे तिथे" असं पुटपुटत माधुरी आपल्या रूममधुन बाहेर पडली. पॅसेजमधे येऊन तिने आसपास पाहिलं. कोणीही नव्हतं. दुसऱ्या खोलीमधले कपल बाहेर गेलेले ते आले नव्हते. त्यांच्या खोलीला बाहेरून लॉक होतं. पहिल्या खोलीमधे एक माणूस होता. असे हॉटेलमालक म्हणाला होता ते दार सुद्धा बाहेरून लावलेलं होतं. आपल्या रूममधून बाहेर पडल्यावर पुढे काही अंतरावरच खोली क्रमांक ४ होती. नकळतच माधुरीची पावले त्या दिशेने वळली. जवळ येऊन पाहताच तिला आश्चर्य वाटलं. कारण खोली क्रमांक ४ च्या दरवाजाला फक्त बाहेरून कडी लावलेली होती. माधुरीने आसपासचा कानोसा घेतला आणि कोण पाहत तर नाही ना याची खात्री करून घेतली.

जिन्याच्या खालून अपूर्वाचा आवाज येत होता ती अजूनही हॉटेलमालकाशी काहीतरी बोलत होती. अजय खोलीमधेच लवंडला होता. टोनी कुठेतरी बाहेर गेला होता.

माधुरीने हळूच कडी उघडली आणि दरवाजा पुढे लोटू लागली. हलकासा कर्रर्रर्र.. असा आवाज झाला.

दरवाजा उघडून माधुरीने खोली क्रमांक ४ मधे प्रवेश केला. खोलीमधे बरीच धूळ साचलेली दिसत होती. जमिनीवरसुद्धा धुळीची पुटं जमलेली होती.

खोलीमधे मध्यभागी एकच बेड होता. बेडवरुन गादी अर्धवट बेडच्या खाली सरकली होती. बाजूचं कपाट अर्धवट उघड होतं. बेडच्या पुढे जमिनीवर कोळशाने कसल्यातरी २-३ विचित्र आकृत्या आणि एक रिंगण काढलेलं दिसत होतं. कोपऱ्यात एक टेबल होतं त्यावर जाडसर धागे आणि चित्रविचित्र बाहुल्या पडलेल्या होत्या. टेबलच्या बाजूला एक काचेची खिडकी होती जिचा पडदा अर्धवट लावलेला होता आणि उरलेल्या अर्धवट काचेच्या भागातून अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे कवडसे आत येत होते. खोलीत एक गूढ शांतता होती जणूकाही दुसऱ्याच जगात आलो आहे अशा प्रकारची. माधुरी दरवाजातच थांबून खोलीतल्या गोष्टींचं निरीक्षण करत होती. खोलीमध्ये बऱ्याच दिवसांपासून कोणीही फिरकले नसल्याचे दिसत होते. माधुरीला या गोष्टीचं आश्चर्य वाटलं कि खोलीतील सामान जसेच्या तसे होते. कोणत्याही प्रकारची दुरुस्ती किंवा कामकाज चालल्याच्या खुणा दिसत नव्हत्या.

हॉटेलमालक उगाचंच दुरुस्तीचं कारण का सांगत होता. आत्ताच खाली जाऊन हॉटेलमालकाला विचारावं म्हणून माधुरी मागे वळून दरवाजा उघडू लागली. त्याच वेळी हूं.. हूं.. एक धीरगंभीर हुंकार तिला ऐकू आला. माधुरीने झटक्यात मागे वळून पाहिलं पण आसपास कोणीही नव्हतं. फक्त तणावपूर्ण शांतता होती. तिला खूपच विचित्र वाटलं. ती परत दरवाजा उघडून बाहेर पडत असतानाच परत जरा मोठ्याने तिला हूं..हा.. असा आवाज आला. पण माधुरीने मागे वळून न पाहता झटकन दरवाजा बंद केला.

दरवाजाला बाहेरून कडी लावून माधुरी आपल्या भास झाला होता कि जे जाणवलं ते सत्य होतं या गोष्टीचा विचार करत आणि आपल्या धडधडत्या हृदयाचे ठोके ऐकत भिंतीला टेकून उभी होती. पण भास तर नक्कीच वाटला

नाही. कसलातरी हुंकारण्याचा आवाज आलाच होता. खोलीत एक गूढ प्रकारची शांतता होती. जमिनीवर काळ्या रंगातल्या त्या आकृत्या कसल्या असतील. माधुरीला काहीच सुचेना. तशाच संभ्रमित अवस्थेत ती जिना उतरून खाली गेली.

इकडे अजयला आपल्या खोलीत बेडवर पडल्या पडल्याचं डुलकी लागलेली. हात पाय पसरून तो बेडवर पडलेला होता.

घु.. घु.. वाऱ्याचा आवाज खोलीभर पसरला. दारे खिडक्या बंद होत्या तरीही वारं आतमधे कसं आलं कुणास ठाऊक. खोलीच्या दरवाजावर नखांनी ओरखडे ओढावेत तसा आवाज आला.

"उठ.. उठ" कुठूनतरी खोल दरीतून घुमल्यासारखा आवाज आला आणि अजय दचकून उठला. त्याच्या कपाळावर घर्मबिंदु जमा झाले होते.

अजयची नजर खोलीभर पसरली खोलीत दुसरं कोणीही नव्हतं पण तरीही आपल्याला कोणीतरी पाहतंय या विचारानेच त्याला उगाचंच पिंगा घातला. अजय बेडवरुन सावकाश खाली उतरला आणि त्याने आपलं डोकं पकडलं. त्याचं डोकं अगदी जड झाल्यासारखं भासत होतं. मगाशी स्वप्न पडून त्यामधे आपल्याला कोणीतरी "उठ उठ" म्हणून सांगत असल्याचं त्याला आठवलं.

'श्या.. संध्याकाळच्या वेळी असं झोपायला नको होतं. उगाचंच चित्रविचित्र स्वप्नं पडतात. अजय मनाशीच म्हणाला.

जड झालेलं डोकं पकडून तो शेजारच्या खिडकीजवळ गेला. त्याने खिडकीतून बाहेर पाहिलं तेव्हा जाणवलं कि अंधार हळूहळू पडू लागलाय. लांबवर क्वचित ठिकाणी दिव्यांची लुकलुक होत होती. पोटात भुकेने आगडोंब

उसळला होता. बाकीचे सगळेजण कुठे आहेत असा त्याच्या मनात विचार आला असताच त्याला खोलीच्या बाहेर पॅसेजमधे मोठमोठ्याने बोलण्याचा आवाज आला. खोलीचा दरवाजा उघडून तो बाहेर आला. समोर पॅसेजमधे हॉटेलमालक आणि माधुरी मोठ्या आवाजात बोलत होते तर बाजूला अपूर्वा हाताची घडी घालून उभी होती.

"अहो मी शपथेवर सांगतेय कि हि खोली क्रमांक ४ उघडी होती" माधुरी हॉटेलमालकाला म्हणाली.

"अहो मॅडम मी पण शपथेवरच सांगतोय कि इथे आत्ता दिसतंय तसंच कुलुप होतं" हॉटेलमालक आपलं म्हणणं मांडत होता. अपूर्वा जरा संशयानेच हॉटेलमालकाकडे तर नंतर माधुरीकडे आळीपाळीने पाहत होती.

त्यांच्याजवळ जात अजय त्या सगळ्यांकडे पाहत बोलला " काय झालंय ... कशाला गोंधळ करताय"

अजय जवळ आलेला पाहताच सगळ्यांची नजर त्यावर गेली आणि आता हॉटेलमालक अजयकडे वळत म्हणाला "अहो बघा ना.. या मॅडम म्हणतायत खोलीला बाहेरून कडी होती आणि त्या या खोलीमधे गेल्या होत्या आणि मी यांना परोपरीने सांगण्याचा प्रयत्न करतोय कि हि खोली बंद आहे जशी आत्ता दिसतं आहे तशीच.. बघा इथे अजूनही कुलूप आहे"

हॉटेलमालकाच्या या म्हणण्यावर अजयने खोली क्रमांक ४ च्या दरवाजाकडे पाहिलं. एक जुनाट वळणाचा दरवाजा होतात व आणि त्याला बाहेरून कुलूप लावलेलं दिसतं होतं.

"अजय मी मगाशी इथे होते तेव्हा या खोलीला फक्त बाहेरून कडी घातलेली होती. मी आतमधे गेलेसुद्धा होते. अजय माझावर विश्वास आहे ना तुझा" माधुरी अजयच्या जवळ जात म्हणाली. अजयने खोली क्रमांक ४ कडे पाहिलं आणि त्याला मनातून मगाशी झोपेत ऐकलेला खोल दरीतून आल्यासारखा घुमलेला तोच आवाज ऐकू आला आणि त्याचं डोकं परत जड झालं.

"अहो मॅडम तुम्ही थकला आहात, त्यामुळे तुम्हाला भास झाला असेल. तुम्ही आपल्या खोलीत जाऊन झोपा मी जेवणाची वेळ झाली कि बोलावतो" असं म्हणून हॉटेलमालक टकलावरचा घाम पुसत जिन्याने लगबगीने खाली गेला.

"मला भास झालेला नव्हता. या खोलीला कुलुप नव्हतंच मुळी ..." माधुरी जिन्याने खाली जाणाऱ्या हॉटेलमालकाल उद्देशून काहीश्या वैतागलेल्या अवस्थेत म्हणाली. पण हॉटेलमालक काहीही बोलता चटचट पायऱ्या उतरून खाली निघून गेला. माधुरी हताश नजरेने अजयकडे पाहू लागली. जो एका हाताने आपलं डोकं चोळत उभा होता.

"ठीक आहेस ना तू.. डोकं दुखतंय का तुझं" माधुरीने काळजीच्या स्वरात विचारलं.

"हो.. मगाशी जरा डुलकी लागली होती आणि उठलो तर डोकंच धरलं माझं" खरखरत्या आवाजात अजय म्हणाला.

"चला आपल्या खोलीत जाऊयात आणि तिथे जाऊन बोलूयात असंही आपल्याला आराम करायला हवाय आता" मगापासून शांत असलेली अपूर्वा

त्या दोघांकडे पाहत बोलली आणि खास करून तिची नजर माधुरीवर होती. अपूर्वाने असं बोलल्यानंतर तिघेही आपल्या खोलीत आले. अजय आपलं डोकं चोळत बेडवर बसला आणि माधुरी त्याच्या शेजारी त्याची विचारपूस करत बसली. अपूर्वा दरवाजातच हाताची घडी घालून दोघांकडे पाहत उभी होती.

काही वेळ शांततेत गेल्यानंतर अपूर्वा म्हणाली "माधुरी तु त्या खोलीकडे का गेली होतीस. जर हॉटेलमालक म्हणत होता कि ती दुरुस्तीच्या कामासाठी बंद आहे"

अपूर्वाच्या प्रश्नावर माधुरीने कपाळावर आठ्या पाडत उत्तर दिलं. "अगं आपल्या खोलीत दोनच बेड आहेत. सगळेच थकलेलो आहोत. अजय आणि टोनीला उगाचंच जमिनीवर झोपावं लागू नये म्हणून जर जागा मिळालीच तर पाहावं म्हणून मी त्या खोलीत गेले होते. ३ क्रमांकांची खोली पेस्टकंट्रोलसाठी बंद आहे. शपथ.. मला खोली क्रमांक ४ च्या दरवाजा कडी लावलेला दिसला"

"तसं असेलही पण मला वाटतं उगाचच आपण हॉटेलमालकाला त्रास न दिलेला बरं आहे" खोलीमध्ये दरवाजापाशी येरझाऱ्या मारत अपूर्वा म्हणाली.

अपूर्वाच्या या वाक्यावर अजय आणि अपूर्वा एकमेकांकडे गोंधळून पाहू लागले. त्यांच्या या अशा पाहण्यावर मग अपूर्वाच म्हणाली "हे बघा जवळ आसपास कुठेही हॉटेल नाहीये आणि हॉटेलमालक आपल्याला स्वस्तात खोली द्यायला तयार झालाय. न जाणो त्याला काही बोललो तर उगाचच रागात आपल्याला बाहेर हाकलून देईल. आजची रात्रच काढायची आहे आपल्याला इथे. कशाला उगा दुसऱ्या गोष्टींकडे लक्ष द्या आणि तसंही रस्त्याच्या बाजूचा

तो गॅरेजवाला उद्या सकाळी येईल असं तो म्हणाला आहे. सकाळ झाली कि त्या गॅरेजवाल्याकडून गाडी दुरुस्त करून आपापल्या मार्गाला निघुयात"

अपूर्वाच्या या तर्कामुळे अजय आणि माधुरी विचारात पडले आणि त्यांना अपूर्वाच तर्क पटला सुद्धा. आपल्याला काय करायचंय कोणती खोली बंद आहे नि कोणती खोली उघडी आहे. गप आजची रात्र या स्वस्तातल्या खोलीत काढू आणि सकाळ झाल्यानंतर निघुयात.

"तुझं डोकं कसं आहे आता. तुझ्यासाठी गोळी आणु का खालून. हॉटेलमधे औषधांचा स्टॉक आहे. मी मगाशीच घेतली एक" अपूर्वा अजयजवळ जात म्हणाली.

"नाही, आता ठीक आहे माझं डोकं. मगाशी जरा जड झालं होतं" अजय म्हणाला.

"बरं तरीही मी आणून ठेवते एकदोन गोळ्या. रात्री कोणाला लागल्याचं तर... बरं हा टोनी कुठे कडमडला आहे? कोणी पाहिलंय का त्याला?" अपूर्वाने त्या दोघांना विचारलं. त्यावर दोघांनी नकारात्मक माना हलवल्या.

"ठीक आहे तुम्ही दोघे आराम करा. मी टोनी कुठे आहे ते पाहून येते" असं म्हणत अपूर्वा खोलीतून बाहेर पडली. पॅसेजमधून पुढे जाताना खोली क्रमांक ४ च्या दरवाजाकडे तिने नजर वळवून पाहिलं. त्या दरवाजाला मगाशी सारखंच कुलूप होतं. जिन्यावरून खाली उतरत ती रिसेप्शनजवळ आली. तिथे कोणीच नव्हतं. कदाचित मालक मागच्या बाजूला असेल म्हणून अपूर्वा रिसेप्शनजवळच्या छोट्या पॅसेज मधून पुढे गेली. तिथे आतमधे भाज्या किंवा खाण्याचं इतर सामान ठेवण्याची जागा होती. तिथून कसलीतरी कुजबुज ऐकू

येत होती. अपूर्वा जरा नजीक गेली आणि आडोशाला उभा राहून तिने कानोसा घेतला.

"अरे वेड्या तुला कळतंय का ती पोरगी त्या खोलीत गेली असं म्हणत होती. सगळीकडे तुला लक्ष दे म्हणालो होतो ना मी" मालकाचा आवाज आला.

"हा मालक.. माज लक्ष हुतं.. सामान आनायला भाईर गेलो हुतो" दुसरा आवाज आला जो किशनचा होता.

"मग दुसऱ्या कोणालातरी लक्ष द्यायला उभं करायचं ना मूर्खा" मालक चांगलाच तापलेला होता.

"पन मालक.. आस किती दिस चालनार. तित काय झालंय माहिती हाये कि आपल्याला हाटील काही दिस बंद ठिवूयात कि.." किशनचा दबका आवाज आला.

"हॉटेल बंद करून आपण खायचं काय? रोजीरोटी बंद करून भागात नाही.. जास्त अक्कल शिकवू नकोस. सांगितलेलं काम करत जा" मालक चरफडत म्हणाला.

अपूर्वा कान देऊन ऐकत होती. ते कशाबद्दल बोलतायत हे तिला काही समजलं नाही. किशन मालकाला काहीतरी सुचवू पाहत होता. कदाचित हॉटेल व्यवस्थित चालत नसेल म्हणून किशनने मालकाला काहीतरी सुचवलं असेल. काही का असेना, मगाशी आपणच ठरवल्याप्रमाणे इतर कोणत्याही गोष्टीकडे जास्त लक्ष न देता फक्त इथे रात्र काढायची असा विचार करून ती हळूच तिथून बाहेर हॉटेलच्या मुख्यदरवाजाजवळ आली. बाहेर आता अंधार पडलेला होता.

हॉटेलपासूनच पुढे एका कोपऱ्यावर टोनी कानात होडफोन्स घालून उभा असलेला तिला दिसला.

भुवया वक्र करूनच ती त्याच्याकडे जायला निघाली. असा कोपऱ्यावर उभं राहून तो काय करत असावा याचा अंदाज अपूर्वाला आलेला होता.

"का रे.. असा का उभा आहेस.. सिगरेट पित आहेस का?" जवळ जाताच अपूर्वा संशयाने टोनीला म्हणाली.

तिच्या अशा अचानक येण्याने टोनी काहीसा दचकलाच. टोनी अधेमधे सिगरेट पित असतो हे सर्वानाच माहिती होतं. म्हनुनच अपूर्वाला शंका आलेली होती कि असा कोपऱ्यावर उभं राहून तो हाच कार्यक्रम तर करत नसावा.

पण स्वतःला सावरत कानातले हेडफोन्स खाली घेत तो म्हणाला "नाही ग.. असंच उभा आहे. तो समोर बाणेरीचा डोंगर पुसटसा दिसतोय बघ. तिकडेच पाहतोय" अपूर्वाने त्या दिशेने पाहिलं. अंधारात पुसटसं डोंगराचं टोकं दिसत होतं आणि त्याच्या पायथ्याला काही ठिकाणी दिवे लुकलुकत होते.

"इथे थांबलो नसतो तर पुढे कुठेतरी तिथेच पायथ्याशी जात आलं असतं. रात्रीचं डोंगराच्या पायथ्याशी राहायला छान वाटलं असतं" टोनी स्मित करत म्हणाला.

"हो ना.. गाडी बंद पडली नसती तर नक्कीच तिथे गेलो असतो" अपूर्वाने परिस्थितीची कल्पना देत टोनीला सांगितलं. यावर टोनी काहीच बोलला नाही. टोनीचा स्वभाव हा बेधडक होता. अंधार म्हणू नका खाच खळगे म्हणू नका सगळीकडे बिनधास्त फिरायचा तो. आत्तासुद्धा इथे हॉटेलवर राहण्यापेक्षा

मस्तपैकी डोंगराच्या पायथ्याशी कुठेतरी राहता आलं असतं या विचारातच तो गुंग होता.

"जेवणाची वेळ झालीय आपण जेवू घेऊ आणि आराम करूयात. सकाळ होताच आपल्याला निघायचंय. अपूर्वाने टोनीला सांगितलं.

त्यावर "तू पुढे हो. मी आलोच" असं म्हणत टोनी समोर डोंगराच्या पायथ्यापाशी लागलेल्या लुकलुकणाऱ्या दिव्यांकडे पाहू लागला.

त्यावर अधिक काहीही न बोलता अपूर्वा माघारी हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळ यायला वळली. अंधार झाल्यामुळे हॉटेलमधे सगळीकडे दिवे लागलेले होते. माघारी येत असतानाच अपूर्वाची नजर वरच्या मजल्यावरील काचेच्या खिडक्यांकडे गेली.

झटकन कोणीतरी वरच्या एका खिडकीतून बाजूला झालं. अपूर्वाला तो आभास जाणवला आणि तशी ती जागीच थांबली आणि पाहु लागली. कोणीतरी त्या खिडकीतून अपूर्वा आणि टोनीला मगाशी बोलताना पाहत होतं. जशी अपूर्वाची नजर वर गेली तसं पटकन ते बाजूला झालं होतं. अपूर्वाला या गोष्टीचं विशेष वाटलं. आपल्याला असं चोरून कोण बरं पाहत असेल? आणि का? तिला या गोष्टीचा काहीसा रागसुद्धा आला. ती कोणत्या बरे खोलीची खिडकी असावी? कोण बरं ती खोली भाड्याने घेऊन राहत असेल? कदाचित त्या खोलीत हॉटेलमालक असावा. मगाशी माधुरीने जो गोंधळ घातला होता त्यामुळे तो सगळ्यांवरच लक्ष ठेवत असेल. अंदाज बांधतच ती पुढे मुख्यप्रवेशद्वाराकडे वळली.

रिसेप्शनच्या मोठ्या टेबलाजवळच तिला हॉटेलमालक उभा असलेला होता. अपूर्वा आतमधे येताच हसून "जेवण तयार आहे. खाली येऊन जेवून घ्या" असं आदबीने हॉटेलमालक म्हणाला. त्यावर होकार भरत अपूर्वा जिना चढुन विचार करतच वर गेली. मालक तर खालीच होता. मग मगाशी खिडकीत कोण असावं? अपूर्वाला प्रश्न पडला. मगाशी खालून वर खिडकीत दिसलेली ती सावली कोणत्या खोलीतील खिडकीची असावी याचा अंदाज बांधत ती पॅसेजमधून पुढे जात होती. अंदाजानेच ती एका खोलीपाशी उभी राहिली. इथे कोणी राहत असेल का असा तिच्या मनात आला. आत जावे कि नाही असं तिला क्षणभर वाटलं. पण आतमधे जाऊन जे कोणी इथे राहत असेल त्याला काय विचारावे? मगाशी खिडकीत तुम्हीच होतात का? का बरे पाहत होतात खाली माझ्याकडे?

अपूर्वाला स्वतःलाच ते प्रश्न अवघडल्यासारखे वाटले. कोणालाही हे प्रश्न वेडसरपणाचे वाटले असते आणि मगाशीच माधुरीने गोंधळ घातला असताना उगाचच आपल्या या शोध मोहिमेची त्यात भर पडेल आणि हॉटेलमालक आपल्याला येथून निघून जा म्हणेल. पण मगाशी खिडकीतून जे कोणी पाहत होतं ते नक्कीच विचित्र होतं. त्याचा छडा लावावाच अशी उर्मी तिच्या मनात दाटून आलेली होती. शेवटी दार वाजवून आतील भाडेकरूला आपण इथे आत्ताच या हॉटेलमध्ये शेजारच्याच खोलीत आलोय. आपली बंद पडलेली गाडी दुरुस्त करणारा कोणी मॅकेनिक आसपास मिळेल का हे विचारून आत प्रवेश मिळवावा असं तिने ठरवलं. मनाची तयारी करून अपूर्वाने त्या खोलीवर थाप मारली. आतून कसलाच प्रतिसाद आला नाही. थोड्या वेळाने अपूर्वाने परत थाप मारली तरीही काही उत्तर नाही.

थोडं वेळ थांबून अपूर्वाने जरा जोरातच थाप मारली तर दरवाजा थोडा पुढे सरकला. म्हणजे दरवाजा उघडाच होता तर अपूर्वा मनातच म्हणाली. दरवाजा थोडासा पुढे करून अपूर्वाने आत डोकावून पाहिलं. आतमधे मिणमिणत्या दिव्याचा प्रकाश होता. कोणिहि आतमधे असल्याची चिन्हे दिसत नव्हती. अपूर्वाने तिच्या नकळतच आतमधे पाऊल टाकले. खोलीत धीरगंभीर शांतता होती. बाहेरून येणारे हवेचे आणि खाली रिसेप्शनवरून येणारे मालक आणि किशन यांचे आवाज अचानक येणे बंद झाले.

न जाणो कोणी बाथरूममधे असेल असं वाटुन अपूर्वाने "हॅलो.. कोणी आहे का"? असे दोनदा आवाज दिले पण कोणीच पुढे आलं नाही.

अपूर्वा त्या मिणमिणत्या प्रकाशात संपूर्ण खोली न्याहाळू लागली. समोर बेड होता. बेडवरुन गादी अर्धवट बेडच्या खाली सरकली होती. बाजूचं कपाट अर्धवट उघड होतं. समोर एक खिडकी होती. खिडकीकडे पाहून अपूर्वाला जाणवलं याचं खिडकीमधे मगाशी कोणीतरी उभं होतं. अपूर्वाची पावले सावकाशपणे खिडकीकडे वळली. काचेच्या खिडकीचा अर्धवट पडदा बाजूला करून तिने खाली पाहिलं तर मगाशी ती खाली उभी होती ती जागा दिसत होती. टोनीसोबत बोलत होती ती जागासुद्धा दिसत होती. पण समोर तर टोनी कुठेच दिसत नव्हता.

अचानक घू... असा धीरगंभीर पण हळू आवाज आला आणि अपूर्वाने मागे वळून पाहिलं. खोलीमधे कोणीही नव्हतं. इथे कोणीच नाहीये याची खात्री अपूर्वाला झालेली होती. पण असं असताना बाहेरचं दार उघडं कसं काय होतं. विचार करतच अपूर्वा खिडकीच्या शेजारी असणाऱ्या टेबलाकडे वळली. शेजारील टेबलवर तिची नजर जाताच तिला धक्काच बसला. धागेदोरे आणि

विचित्र काळ्या बाहुल्या तिथे पडलेल्या होत्या. मिणमिणत्या प्रकाशात तिला टेबलावर काय आहे ते लांबून समजलंच नव्हतं. टेबलाजवळ गेल्यावर हे सगळं पाहून तिला चांगलाच हादरा बसला. हे तर काहीतरी वाईट शक्तींची उपासना करण्याचं तंत्र साहित्य आहे. अपूर्वाची तर मतीचं गुंग झाली. अपूर्वाचं लक्ष टेबलच्याखाली गेलं. टेबलच्याखाली एक ड्रॉवर होता. अपूर्वाने सावकाशपणे तो ड्रॉवर उघडला. उघडताना त्याचा कर्रर्रर्र असा लयीत हळुवार आवाज झाला जो खोलीभर घुमला. आतमधे हात घालून अपूर्वाने चाचपलं. तिला एक कागदासारखं काहीतरी हाताला लागलं. अपूर्वाने ते बाहेर काढलं तर तो एक फोटो होता. अंधुक प्रकाशात जास्त काही दिसत नव्हतं. फोटो तिने जरा डोळ्यांसमोर धरला. कुणा व्यक्तीचा फोटो दिसत होता आणि त्याच्या चेहऱ्याभोवती एक लाल रंगाचं वर्तुळ काढलेलं होतं. अपूर्वाला काहीतरी शंका आली म्हणून तिने फोटो अजून जवळ धरला तर तिला अजून एक धक्का बसला कारण ते लाल रंगाचं वर्तुळ हे रक्ताने काढलेलं होतं. वर्तुळातून लाल ठिपके बाहेर पसरलेले होते. अपूर्वाला इथे या खोलीत काहीतरी भयानक प्रकार चाललेला आहे याची कल्पना आलेली होती.

ती या सगळ्या प्रकारचा विचार करत असतानाच मागून दरवाज्याचा खाड्कन आवाज झाला. अपूर्वा गर्रकन मागे वळाली. मगाशी उघडा असणारा दरवाजा अचानक बंद झालेला होता. अपूर्वा वेगाने दरवाजाजवळ गेली. दरवाजाची मूठ पकडून तिने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला पण दरवाजा काही उघडला नाही. कदाचित तो लॉक झालेला असावा.

हूं... हा.. एक अंगावर शहारे आणणारा धीरगंभीर हुंकार खोलीभर पसरला.

आता मात्र जिवाच्या आकांताने घाबरून अपूर्वाने जोरजोरात दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करू लागली. पण दरवाजा काही उघडेना. तेवढ्यात खोलीतल्या अर्ध्या उघड्या कपाटातून धडधड असा झाला. अपूर्वाने थरथरत तिकडे वळून पाहिलं. तिचं तिच्या शरीरावरचं नियंत्रण सुटल्यासारखं झालं होतं. श्वास रोखून ती कपाटाच्या दिशेने पाहत होती. कपाटातून एक हलकीशी खरखर ऐकू आली. कपाटात काहीतरी होतं जे बाहेर पडायला बघत होतं.

अपूर्वाचा चेहरा पूर्णपणे घामाने डबडबला होता. तरीही भारल्याप्रमाणे ती कपाटाकडे पाहतच होती. त्या अर्धवट उघड्या कपाटाच्या दरवाजातून एक पांढराशुभ्र हात बाहेर आला. कपाटाच्या दरवाजाला त्या हाताने आतूनच पकडलं. हे पाहून तर अपूर्वाची बोबडीचं वळली.

मोठ्याने किंचाळून अपूर्वाने जोरजोरात दरवाजावर धक्के द्यायला चालू केले. "कोणी आहे का.. कोणी आहे का..वाचवा..?" असं म्हणत अपूर्वा अक्षरशः दरवाजावर बुक्क्या मारू लागली. मागे कपाटातील पांढरा हात आतूनच कपाटाचं दार पकडून हळुवारपणे उघडू लागला.

अपूर्वा दरवाजा बडवत असतानाच खोलीचा दरवाजा अचानक उघडला गेला. अपूर्वा गांगरलीच आणि धडपडत पटकन बाहेर पडू लागली. खोलीचा दरवाजा उघडून कोणीतरी तिला बाहेर ओढलं होतं. अपूर्वा झटकन बाहेर पडली. बाहेर उभ्या असलेल्या व्यक्तीच्या ती अंगावरच कोसळली. तिच्या या आवेशात बाहेर पडण्याने अपूर्वा आणि ती व्यक्ती दोघेही पॅसेजमधल्या जमिनीवर कोसळले. घाबरून अपूर्वा जमिनीवर गलितगात्र झाल्यासारखी पडलेली होती. आपण कोणाच्या अंगावर कोसळलो ते पाहायला सुद्धा तिने मान वळवलेली नव्हती. थोड्या वेळाने तिच्या शेजारून कोणाच्यातरी

हसण्याचा आवाज आला. ती ज्या व्यक्तीच्या अंगावर कोसळली होती जिने तिला त्या खोलीतून बाहेर काढलेलं होतं ती व्यक्ती जमिनीवर लोळतच हसत होती. अपूर्वाने रागातच शेजारी पाहिलं तर बाजूला टोनी जमिनीवर लोळत हसत होता.

अच्छा तर टोनीने आपल्याला त्या भयानक खोलीतून बाहेर काढले तर विचार करतच अपूर्वा उठली आणि तिने आपले कपडे झटकले. टोनी अजूनही दात काढतच जमिनीवर पडलेला होता.

"तुला हसायला काय झालंय. तुला माहिती का आतमधे मी काय पाहिलंय." टोनीच्या मुर्खासारख्या हसण्यावर अपूर्वाला खरतर धक्काच बसला.

"हसू नको तर काय करू?.. मगाशी वर येताना मला हा दरवाजा उघडा दिसला आतमधे पाहिलं तर तू पाठमोरी उभी होती. म्हटलं थोडी गम्मत करावी मग धाडकन आवाज करत दरवाजा बाहेरून लावून घेतला" असं म्हणत टोनी अजूनच हसू लागला.

त्याचं हे बोलणं ऐकून तर अपूर्वाचं टाळकंच सटकलं. आतमधे भीतीने आपली गाळण उडालेली असताना हा निर्लज्ज टोनी दात काढतोय आणि सगळ्यात कहर म्हणजे दरवाजा यानेच बाहेरून लावलेला होता. तेपण का? तर आपली गंमत करायला. काय हा मूर्खपणा. खोलीत आपण काय अनुभवलं हे अपूर्वालाच माहिती होतं. हसत हसत टोनी जागचा उठला.

अपूर्वा संतापाने थरथरत होती. तशाच अवस्थेत ती त्याच्या जवळ गेली आणि खाडकन टोनीच्या मुस्काटात मारली. टोनीला याची सुतराम कल्पना

नव्हती कि अपूर्वा असं काहीतरी करेल. अर्थात अपूर्वा हे करू शकत होती पण या छोट्याश्या मस्करीवर तिने एवढं रिऍक्ट व्हावं याचं त्याला आश्चर्य वाटलं.

"मूर्ख माणसा आतमधे माझी अवस्था काय झाली होती माहिती का? आतून मी जिवाच्या आकांताने ओरडत हाका मारत होते. तुला ऐकायला आलं नाही का माकडा.. तुला हि सगळी गंमत वाटली का?" अपूर्वा रागात म्हणाली. भीतीने तिचं अंग अजूनही थरथरत होतं.

"थोडावेळ फक्त दरवाजा लावून तुला भीती दाखवावी असं वाटलं. पण मला आतून तुझा कसलाहि आवाज ऐकू नाही आला" टोनी खाली मान घालून गालावर हात ठेवत म्हणाला.

"कसला खोटारडा आहेस रे.. धडाधड मी दरवाजा वाजवत होत आणि ओरडत होते आणि तुला ऐकू आलं नाही म्हणतोस.. नालायक" अपूर्वा अजूनच खेकसत म्हणाली.

"नाही शपथ... मला कसलाही आवाज नाही आला. ना तुझा ना इतर कसला.. मी फक्त तुला ऐकू जाईल अशा पद्धतीत दरवाजा ओढून लावला आणि थोड्यावेळाने तुझ्या २-३ थापा दारावर पडल्या तेवढ्या काय त्या ऐकल्या. मग वाटलं घाबरलीस तू आणि मग लगेच उघडला." टोनी आपली बाजू मांडत म्हणाला.

त्यावर अपूर्वाने काहीच विचारलं नाही. कपाळावर आठ्या पाडून तिने बाजूच्या खोलीच्या दाराकडे पाहिलं मग पॅसेजमध्ये आजूबाजूला पाहिलं. पॅसेजमध्ये दुसरं कोणीही हा धुडगूस बघायला नव्हतं याचं तिला हायसं वाटलं. आजूबाजूच्या खोल्या बंदच होत्या. आत्ता बाहेर पडलेल्या खोलीच्या

दरवाजाकडे अपूर्वाने पाहिलं आणि तिच्या लक्षात आलं कि ती खोली क्रमांक ४ मधे गेलेली होती. खोलीमधे मगाशी अनुभवलेल्या गोष्टी आठवताच एक भीतीची शिरशिरी तिच्या अंगातून विद्युतप्रवाहाप्रमाणे गेली. त्या खोलीपुढून तात्काळ दूर जावे अशी इच्छा तिला झाली. तरातरा चालत ती तिथून आपल्या खोलीकडे निघाली. तिच्यामागून टोनीसुद्धा सावकाशपणे खोलीत आला.

खोलीत अजय आणि माधुरी बेडवर काहीतरी बोलत बसले होते. अपूर्वा आणि टोनीच्या खोलीत एकदम येण्याने ते दोघेही चांगलेच दचकले. अपूर्वाचा तर अवतारच झालेला होता. अंगावर सगळीकडे धूळ होती, कपडे मळके दिसत होते, केस अस्ताव्यस्त झालेले होते. ती भीतीने थरथरत असल्यासारखी वाटतं होती. मगाशी त्या खोलीत कपाटातून बाहेर येत असलेला पांढरा शुभ्र हात पाहून तिची अशी अवस्था होणं सहाजिकच होतं. माधुरीने जागेवरून उठून तिच्याजवळ जात तिची विचारपूस केली असता अपूर्वाने खोली क्रमांक ४ मधील आलेला तो भयानक अनुभव त्या सगळ्यांना सविस्तर कथन केला. माधुरीने हे ऐकून तोंडावरच हात ठेवला आणि म्हणाली "बघा.. मी म्हणाले होते ना कि मगाशीसुद्धा ती खोली बाहेरून उघडी होती. आतमधे नक्कीच काहीतरी विचित्र आहे" अपूर्वा अजूनही दहशतीखाली असल्यासारखी वाटत होती. माधुरीने तिला मिठी मारली आणि तिचं सांत्वन करू लागली.

टोनीला या सगळ्या प्रकरणावर काय बोलावे तेच समजेना कारण त्याने इथे आल्यापासून असला कोणताच अनुभव घेतलेला नव्हता म्हणून तो फक्त मान खाली घालून आणि कपाळाला आठ्या पाडून ऐकण्याचं काम करत होता. अजय मात्र खिडकीच्या बाहेर आपली दुखरी मान चोळत पाहत होता. बाहेर चांगलाच अंधार पडलेला दिसत होता. हॉटेलपासून काही अंतरावर असणारे ते

गॅरेज आणि त्यामागची बेवारस गाडी या खिडकीतून दिसतेय का ते पाहण्याचा त्याचा प्रयत्न चाललेला होता. मगाशी तिथे त्या गाडीजवळ असताना त्यालासुद्धा असाच विचित्र अनुभव आलेला होता. तो अनुभव आपल्या मित्रांना सांगावा का असं त्याला वाटलं. पण काहीसा विचार करून त्याने ते का कुणास ठाऊक टाळलं.

एवढ्यात दरवाजावर टक टक झाली. सगळेजण दरवाजाकडे पाहू लागले पण जागचं हललं कोणीच नाही. अपूर्वाने मात्र माधुरीचा हात पटकन घट्ट पकडला. काही वेळाने परत टक टक झाली. टोनी जो दरवाजाजवळच उभा होता त्याने सावकाशपणे दरवाजाकडे जात कडी उघडली आणि हळूच बाहेर पाहिलं तर बाहेर हॉटेलचा नोकर किशन उभा होता.

"जेवन तयार आहे. मालकानी खाली बोलावलंय" आपल्या खरखरत्या आवाजात किशन म्हणाला.

त्याचा आवाज ऐकताच अपूर्वा दरवाजाकडे जात म्हणाली "आम्ही सगळे इथेच खोलीत जेवू शकतो का?

अपूर्वाच्या अचानक समोर येण्याने किशन जरासा शांत झाला. पण नंतर लगेचच म्हणाला "मालकानी खाली येऊनच जेवाय सांगितलंय. वर जेवनं आणायला स्वयंपाकी नाहीयेत आत्ता हॉटेलमधे"

त्याच्या या उत्तरावर अपूर्वा काहीतरी बोलणारच होती इतक्यात मागून माधुरी म्हणाली "हो मालकांना सांगा आम्ही आलोच लगेच" माधुरीच्या या उत्तरावर किशन लगोलग तिथून निघाला.

अपूर्वाने कपाळावर आठ्या पाडत माधुरीकडे पाहिलं. त्यावर माधुरी म्हणाली कि उगाचच कशाला त्या बिचाऱ्याला जेवण वर आणायला सांगायचं. मालक सांगतोय खाली येऊन जेवण करा तर जाऊन येऊया. इथे कोणाच्याच तोंडाला न लागता गुपचूप एक रात्र काढून सकाळी पळून जावं असं माधुरीचं ठाम मत झालेलं होतं. अपूर्वाला अजूनही मगाचा तो खोली क्रमांक ४ मधला क्षण आठवला तरी थरकाप सुटत होता. माधुरीने तिला जवळच धरून ठेवलं होतं. सगळ्यांनी मग पटकन फ्रेश होऊन खाली जेवायला जायचं ठरवलं. सगळेजण खोलीतून बाहेर पडून पॅसेजमधून जात होते. पॅसेजमधून ते सगळेजण खोली क्रमांक ४ च्या पुढून जात असतानाच माधुरीची आणि अपूर्वाची नजर आपसूकच खोली क्रमांक ४ च्या दरवाजाकडे वळली. अजय आणि टोनीचं मात्र लक्ष नव्हतं ते आपले पुढे निघून गेले.

त्या दरवाजाकडे पाहताच अपूर्वाने माधुरीचा हात इतक्या जोरात दाबला कि तो लाल पडला. माधुरी सुद्धा हादरलीच. कारण आत्ता ते खोली क्रमांक ४ च्या पुढून जात असताना त्यांना दिसलं कि खोली क्रमांक ४ च्या दरवाजाला चक्क कुलूप आहे.

दोघींनी भयभीत आणि सूचक नजरेने एकमेकींकडे पाहिलं. इथे कुलूप कसं काय असू शकतं. कारण मगाशीच दोघींनी खोली क्रमांक ४ च्या दरवाजाला बाहेरून उघडा असलेला पाहिलं होतं. अपूर्वा हेच माधुरीकडे पाहत बोलणार होती पण माधुरीने तोंडावर बोट ठेवून तिला चुप्प बसण्याची खूण केली. दोघी एकमेकींना आधार देताच पॅसेजमधून खाली जेवणाच्या खोलीकडे गेल्या.

खाली लगेजरूमच्या शेजारीच खाण्याची व्यवस्था केलेली होती. खोलीच्या मधोमध मोठं टेबल मांडलेलं होतं आणि हॉटेलमालक टेबलाच्या एका टोकाला बसलेला होता. बाजूला ठेवलेल्या खुर्च्यांवर सगळेजण बसले आणि किशनने भराभरा ताटे वाढली.

"काय मग खोली आवडली कि नाही" हसत हसत मालक सगळ्यांकडे पाहत म्हणाला.

या प्रश्नावर कोणालाच काय बोलावे ते कळेना.

"छान आहेत..पण आम्हाला काय एकच रात्र काढायचीय" टोनी कोरडं हसत म्हणाला.

"हो.. हो.. खरंय खरंय..जेवा जेवा.." मालक म्हणाला.

"हॉटेलमधले बाकीचे भाडेकरू कुठे आहेत" अजय म्हणाला. कारण जेवणाच्या टेबलवर त्या चौघांव्यतिरिक्त कोणी नव्हतं.

यावर मालक जरासा थांबला. पण त्याने हसून उत्तर दिलं "बाकीचे भाडेकरू सकाळीच फिरायला गेले ना डोंगराकडे. तिथे बऱ्याच गोष्टी आहे पाहण्यासारख्या. फिरून झालं कि रात्री मुक्काम करतात लोक तिथे आणि दुसऱ्या दिवशी इथे हॉटेलवर येतात"

हॉटेलमधे खोली बुक केलेली असताना परत कोणी प्रवासी डोंगराच्या पायथ्याशी का मुक्काम करेल हे कोणालाच कळेना. पण भूक लागल्याने कोणी काही प्रश्न विचारले नाही. पटापट पुढ्यात वाढलेल्या अन्नावर सगळेजण तुटून पडले.

"तू खूप शांत वाटतेयस बेटा" अपूर्वाकडे प्रश्नार्थक नजरेने पाहत मालक म्हणाला. एवढी बडबडणारी अपूर्वा अचानक शांत कशी बसली असं वाटून मालकाने हा प्रश्न विचारला होता.

या प्रश्नावर अपूर्वा जरा दचकलीच. आपण का शांत झालोय याचं उत्तर मालकाला सांगून सुद्धा पटेल कि नाही हे अपूर्वाला समजलं नाही म्हणून ती फक्त मान खाली घालून आपल्या ताटाकडे पाहत बसली

"आमची बंद पडलेली गाडी ढकलून ढकलून जरा दमलेय ती" कसनुसं हसत माधुरीने मालकाला उत्तर दिलं.

त्यावर अच्छा.. असं होय.. अशी प्रतिक्रिया देऊन मालक काहीही न बोलता जेवू लागला. अजय आपल्या मानेला झटके देत ताटात पाहत बसला होता. जणू काही त्याच्या मानेला लचक भरली असावी. टोनी मात्र एक प्रकारच्या वेगळ्याच चिंतनात गढला. हॉटेलमधे आपण सोडून इतर कोणीच नाही आणि अपूर्वा आणि माधुरीला हॉटेलमधल्या त्या गूढ खोलीत आलेले विचित्र अनुभव. जेवण करायला आपण सोडून मालक आणि किशन एवढेच. इतर कोणताही हॉटेलचा कर्मचारी आसपास नाही. नक्की चाललंय काय इथे. टोनीला एक वेगळीच शंका आलेली होती.

आपली शंका बरोबर आहे कि नाही हे पडताळायला हवं असं वाटून टोनी पटापट जेवायला लागला आणि सगळ्यात आधी त्याने जेवण संपवलं. जेवण झाल्यावर आपल्याला सिगरेट प्यायची असते हे कारण सांगून टोनी तिथून सटकला. त्यावर त्याला कोणी काही हटकलं नाही. जेवणाच्या खोलीतून टोनी सरळ रिसेप्शनच्या टेबलाजवळ आला. कोणी आपल्याला पाहत नाहीये याची

खात्री करून तिथे असलेलं रजिस्टर त्याने उचललं आणि चाळू लागला. इकडे तिकडे पाहत सावधगिरीनेच त्याने रजिस्टर पाहायला सुरुवात केली.

आजच्या तारखेखाली खोली क्रमांक ५ सोडली तर कोणतीच एंट्री नव्हती. इतर खोल्या कोणीच बुक केलेल्या नव्हत्या. इतकच नव्हे तर मागची काही पाने उलटली असता त्याला असं आढळलं कि मागच्या महिन्याभरापासून कोणतीच खोली बुक झालेली नव्हती. टोनीला हे पाहून आश्चर्य वाटलं नाही. कारण त्याला मगाच संशय आलेला होता. हॉटेलच्या पार्किंगमधे इतर कोणाच्याही गाड्या नाहीयेत. मगाचपासून आपण चौघेजण सोडले तर कोणी गिऱ्हाईक खोली बुक करायला आलेलं नाही. मगाशी बाहेर उभं राहून त्याने रस्त्यावर अंदाज घेतलेला होता कि डोंगराच्या पायथ्याला काही प्रमाणात राहण्याची सोय असावी. गाड्या रस्त्यावरून थेट तिथेच जातात. इथे कोणीही थांबतं नाहीये.

नक्कीच काहीतरी गौडबंगाल आहे नाहीतर असं इथे कोणीच कसं येत नाहीये. जेवणाच्या खोलीतून कोणीतरी बाहेर येत असल्याचा आवाज आला आणि टोनी रजिस्टर सावकाशपणे टेबलवर आहे तसं ठेवून हॉटेलच्याबाहेर वळाला. हॉटेलबाहेर रस्त्यालगत हॉटेलच्या नावाचा बोर्ड होता तिथे जाऊन टोनी सिगरेटचे झुरके मारत उभा राहिला. बाहेर किर्रर्र काळोख पसरलेला होता. बाणेरीच्या पायथ्याला दिव्यांची लुकलुक दिसत होती. हॉटेलच्या पार्किंगच्या बाजूला कसलातरी आवाज आला म्हणून टोनीने मागे वळून पाहिलं तर हॉटेलमधला नोकर किशन लाकडे आणि इतर गोष्टी गोळा करून शेकोटी करत होता. किशनला पाहताच टोनीला वाटलं कि हा किशन किती दिवसांपासून इथे

कामाला असेल? असं वाटून टोनी किशनकडे जाऊ लागला. किशनने लाकडे व्यवस्थित करून जाळ केलेला होता.

"काय किशन काका मस्त शेकोटी करताय" टोनी मुद्दाम खेळीमेळीच्या स्वरात म्हणाला.

"शेकोटी.. असं काय नाय. मागच्या अंगणात कागदे कपटे आणि कचरा पडलेला होता. तो जरा जाळून टाकावा म्हटलं" किशन शांतपणे म्हणाला. शेकोटी पेटवून किशन बाजूला जाऊन बसला आणि बंडीच्या आतमधे बिडी शोधू लागला. किशन खुरटी दाढी असलेला एक मध्यम वयाचा इसम होता.

"तुम्ही किती वर्षांपासून इथे कामाला आहात" खाली बसत गुडघ्यावर हात ठेवत टोनीने विचारलं.

"मला झाली असतील तीनेक वर्षे" बंडीच्या आतल्या भागात बिडी सापडल्याने किशनने शेकोटीतून एक लाकूड काढलं आणि बिडी पेटवू लागला.

"हि घ्या सिगरेट... बिडीपेक्षा छान आहे" आपल्याजवळील सिगरेट किशनला देत टोनी म्हणाला. किशनकडून काही माहिती काढायची म्हटल्यावर त्याला काहीतरी देणे टोनीला गरजेचे वाटले. टोनी देत असलेली महागडी सिगरेट पाहून किशनच्या डोळ्यात चमक आली. पटकन त्याने टोनीकडून ती सिगरेट घेतली आणि विस्तवाने पेटवली.

"तुमचे सगळे दोस्त गेलेत झोपायला त्यांच्या खोलीत.. तुमी का बाहेर आहात" सिगरेटचा एक दीर्घ झुरका घेत किशन म्हणाला. आजूबाजूला चांगलाच काळोख पडलेला होता. हॉटेलमधले मोठे दिवे विझवुन आता तिथे

मिणमिणता प्रकाश होईल एवढेच दिवे लावलेले होते. तेवढाच काय तो प्रकाश पसरलेला होता.

"मला लवकर झोप येत नाही म्हणून जरा बाहेर पाय मोकळे करावं म्हटलं" टोनीने उत्तर दिलं.

"असं वय.. थोडंसं थांबून किशन आगीकडे पाहत गंभीर आवाजात म्हणाला. "रातच्याला बाहेर फिरू नये हित."

"का बरं.. काही अडचण आहे का इथे हॉटेलमधे" त्याचं गंभीर आवाजात टोनीने किशनला विचारलं.

सिगरेटचा अजून एक झुरका घेत किशनने हॉटेलकडे पाहिलं. सगळीकडे शांतता वाटतं होती. किशनच्या चेहऱ्यावर एकप्रकारची गूढमिश्रित गंभीरता आलेली होती. शेकोटीच्या उजेडात किशनच्या चेहऱ्यावर ती स्पष्ट दिसत होती.

शेकोटीकडे पाहत किशन हळू आवाजात म्हणाला "हित फुडं जो डोंगर हाये. बानेरीचा हो... तीत काही लोक का येत्यात माहिती का तुमाला"

"फिरायला येत असतील" टोनी किशनकडे पाहुन म्हणाला.

"हा ते येत्यातच हो.. पण सगळेचजण फिरायला येत नाईत. काही लोक वेगळ्या कामाला पन येत्यात" असं बोलून किशन परत हॉटेलच्या दरवाजाकडे पाहू लागला. जणू काही कोणाचा कानोसा घेत असावा.

"म्हणजे मला नाही समजलं.. फिरण्याशिवाय इथे अजून काय काम असतं लोकांचं?" टोनी किंचित आठ्यायुक्त चेहऱ्याने म्हणाला.

"तुमि शहरातील मानस आहात. तुमाला असल्या गोष्टी नाहीत पटनार" किंचित हसत किशन शेकोटीतील लाकडे व्यवस्थित करू लागला.

"तुम्ही आमच्यापेक्षा जास्त अनुभवी आहात. तेव्हा तुम्ही जे सांगाल ते खरंच असेल. त्यामुळे विश्वास ठेवावाच लागेल. तसंही इथे या हॉटेलवर जास्त लोक येत नाहीत वाटतं" किशनला अजून बोलतं करण्यासाठी टोनी संभाषण वाढवत म्हणाला.

टोनीच्या या बोलण्यावर किशनने फक्त कोरड्या नजरेने टोनीकडे पाहिलं. थंड नजरेने टोनी फक्त किशन आता काय बोलेल हे पाहू लागला.

शेकोटीतले एक लहान लाकूड काढून जमिनीवर रेघोट्या काढत किशन बोलू लागला" आपल्या हॉटेलवर आदी लय मानस यायची राहायला. काही जण फिरायला आलेले असायचे. काही असेच... बानेरीच्या पायथ्याला पूर्वी एक समशान होतं. असं काही जुनेजाणते लोक म्हणत्यात. लैच जागृत समशान हुतं. तांत्रिक उपासना करणारे साधक लोक आजबी तीत साधना करायला येत असत्यात"

"ओह्ह म्हणजे मांत्रिक लोक" टोनी जास्तच गंभीर आवाजात म्हणाला.

"हा आन.. उपासना वगेरे झाली कि राहायची सोय म्हणून हॉटेलवर किंवा तिथेच पायथ्याला कुठेतरी राहत्यात" किशनने माहिती पुरवली.

किशनने हि माहिती सांगताच टोनी चांगलाच विचारात पडला. या इथल्या हॉटेलवर सुद्धा त्या वाम गोष्टीचा प्रभाव आहे कि काय असं त्याला वाटलं.

"आपल्या हॉटेलवर सुद्धा ती लोक येत होती का? तुम्ही म्हणालात कि आधी लोक यायचे खूप इथे आता येत नाहीत असं का"? टोनीने किशनला प्रश्न विचारले.

टोनीच्या या प्रश्नावर किशनने आपली खुरटी दाढी खाजवली आणि गंभीरपणे टोनीकडे पाहिलं. त्या गडद काळोख्या रात्रीत त्या दोघांचं संभाषण मधेच थांबल्यानंतर जाणवणारी शांतता भयावह वाटत होती.

"आपल्या हाटीलवर काही महिन्यांपूर्वी एक मानुस आलेला हुता. तांत्रिक वाटतं नवता. सादा आपल्यासारखाच मानुस हुता. बरेच दिस होता मुक्काम त्याचा. सांच्याला इथून निघायचा आन सकाळी झाली कि परत याचा. त्याच्या खोलीत एकदा चहा द्यायला गेलो होतो. मला आतमदी पण येऊ दिलं नाई त्याने. थोडासा दरवाजा उघडला चहा घेतला आन खाडकन दरवाजा लावला. पण तेवढ्या उघडलेल्या दरवाजातून माजी नजर आतमदी गेली हुती. खोलीत अंधुकसा धूर होता कसलासा आन जमिनीवर कसल्यातरी रेगोट्या काढलेल्या होत्या. आन त्या रेगोट्याच्या मदे एक फुटू होता कोणाचातरी." किशनने पटापट सांगितलं आणि थोडावेळ सिगरेटचे झुरके घेतले.

"मग पुढे काय" टोनी कान देऊन किशनचं बोलणं ऐकत होता. शेकोटीचा अग्नी मंदपणे जळत होत होता. संभाषण थांबल्यानंतर आजूबाजूला मगासारखीच भीषण शांतात पसरली.

"तेच्या खुलीत मी जे काय पायलेल... ते समदं मालकाला सांगितलं. पन मालकाने काय लक्ष दिल नाई. नंतर एके दिशी तो मानुस रात्री गेलेला तो परत सकाळच्याला आलाच नाई. अचानकच गायब झाला. तेच्या खोलीला कुलूप लावलेलं हुतं. आमी लय वाट पाईली पन तेचा पत्ता काय लागला नाई. तेचि गाडीबी पार्किंग मदी तशीच पडून होती. तो काही परतला न्हाई मंग मालकाने तेची गाडी नंतर गॅरेजवाल्याला दिऊन टाकली. एके दिशी वरच्या मजल्याव कामानिमीत मी फिरत होतो. तर त्या कुलूप लावलेल्या बंद खोलीतून

कसलातरी घुमल्यासारखा आवाज आला होता. शेजारच्या खोल्या तवा भाड्याने दिलेल्या होत्या. ती लोकंबी तकरार करायले कि कसलातरी कि आवाज येतोया खुलीतून" किशनने एवढं बोलून आवंढा गिळला. टोनी पापणीही न लावता किशन सांगत असलेली हकीकत ऐकत होता. टोनीच ह्दय नाही म्हटलं तरी धडधायला लागलं होतं.

किशन पुढे बोलू लागला - "मग मालकांनी ती खुली काय उघडली नाई. हळूहळू आसपासच्या लोकास्नी कळलं कि इत हाटीलमदी काईतरी अडचण आहे. तवा लोकं हित यायची कमी झाली. मी म्हनलं मालकाला कि हाटील बंद करूयात तर मालक मलाच ओरडला. मंग म्या भी कानाला खडा लावला.. हा तुमी मालकाला सांगू नगा बरका मी तुमाला हे समद सांगितलंय म्हनून"

"बरं.. कोणत्या खोलीत थांबलेला तो माणूस" टोनीने विचारलं

"खुली वय... खुली क्रमांक चार" एवढं बोलून किशनने सिगारेटचं थोटूक समोर आगीच्या मंद ज्वाळांमधे टाकलं. जळताना थोटकाचा चरचर आवाज झाला.

हे ऐकून टोनीची विचारचक्रे फिरू लागली. टोनीला आत्ता समजत होतं कि अपूर्वाला आणि माधुरीला तसे भयाण अनुभव का आले. त्या खोलीत तो माणूस नक्कीच तंत्र शक्तींची उपासना करत असणार आणि अचानक तो गायब झाला. आता ती खोली वाईट शक्तींनी भारलेली आहे. बाणेरीच्या पायथ्याला तंत्र साधनेच्या उपासनेसाठीच तो माणूस जात असावा. पण तो माणूस गायब झाल्यानंतर खोलीचं दार कधी उघडलंच गेलं नाही असं असता अपूर्वा आणि माधुरीने आतमधे प्रवेश कसा काय मिळवला होता. टोनीला या गोष्टीचा काहीच उलगडा होईना. टोनीचं सगळं अंग शहारलं. हॉटेलमालकाने पद्धतशीरपणे या

सगळ्या गोष्टी लपवल्या होत्या. स्वतःच्याच पोटावर लाथ कोण मारणार म्हणून तो हॉटेल अजूनही चालवत होता.

टोनी पटकन आपल्या जागेवरून उठला. आपली खोली सोडून आसपास कुठेही फिरकू नका. सकाळ झाली कि त्वरित इथून निघूयात असं त्याला लवकरात लवकर आपल्या मित्रांना सांगायचं होतं. हॉटेलमध्ये प्रवेश करून तो लगबगीने जिन्याने वर जाऊ लागला. पॅसेजमधे अंधुकसा प्रकाश होता. आपल्या खोलीकडे जाताना टोनीने कटाक्षाने खोली क्रमांक ४ कडे पाहणं टाळलं. आपली खोली जवळ येताच त्याने दार उघडलं. दरवाजा आतून लावलेला नव्हता याचं त्याला बरं वाटलं. खोलीत अंधार होता. नाही म्हणायला खिडकीच्या बाहेरून रस्त्याच्या कडेला असणाऱ्या दिव्यांचा प्रकाश येत होता. टोनीने लाईटच्या स्विचकडे हात नेला आणि लाईटच बटण दाबलं.

खोली प्रकाशाने उजळून निघाली. टोनीने समोर पाहिलं आणि त्याचा श्वासच थांबला. आपलं हृदय बंद पडतंय कि असं त्याला वाटलं. समोर आपापल्या बेडवर माधुरी आणि अपूर्वा पडलेल्या होत्या. पण रक्ताच्या थारोळ्यात.... त्यांच्या डोक्याची शकलं झालेली होती.

टोनीने आपलं डोकं पकडून घाबरून खाली बसकणच मारली. त्याला काय करावं तेच सुचेना.. समोरचं दृश्य बघवत नव्हतं. काहीतरी करणं गरजेच होतं. कोणाला बोलवावं कि काय करावं. काहीच न सुचून काही मिनिटे टोनी थंड बसून राहिला. नंतर तो जरा भानावर आला. त्याला वाटलं नक्कीच या गोष्टीचा संबंध खोली क्रमांक ४ शी असला पाहिजे. अजयचा कुठेच पत्ता दिसत नव्हता. अजय कुठे गेला असेल त्याला शोधावं लागेल.

सगळा धीर एकवटून टोनी जागचा उठला आणि खोलीतून बाहेर पॅसेजमध्ये आला. त्याचं सगळं अंग थरथरत होतं. पॅसेजच्या मिणमिणत्या प्रकाशात तो पुढे आला तेव्हा खोली क्रमांक ४ च्या जवळ तो आला आणि त्याला दिसलं कि दरवाजा थोडासा उघडा आहे. त्याने अनिच्छेनेच बाहेरून आतमधे डोकावून पाहिलं. आतमध्ये खोलीच्या मधोमध त्याला कोणीतरी पाठमोरं उभं दिसलं. आतमध्ये अंधुक प्रकाश होता. कोण असावं म्हणून टोनीने जरा डोळे किलकिले करून पाहिलं तर त्याला दिसलं कि ती व्यक्ती दुसरी तिसरी कोणीही नसून अजय होता. अजय आतमधे काय करतोय हे पाहून टोनीला धक्काच बसला. अजय बेडच्या पुढे उभा राहून घुमत होता. बेडच्या समोर काढलेल्या कसल्यातरी रिंगणात तो उभा होता. त्याची मान सावकाशपणे मागे पुढे हलत होती. टोनी नखशिखांत हादरला होता. आपल्या खोलीत माधुरी आणि अपूर्वाची अवस्था काय झालीय हे सांगून तात्काळ हे हॉटेल सोडलं पाहिजे असं अजयला सांगणं गरजेचं होतं. आपण खोली क्रमांक ४ मधे शिरतोय हे माहित असूनही नाईलाजाने टोनी दार ढकलून आतमधे आला. "अजय अजय..." टोनीने लागोपाठ हाका मारल्या. पण अजयने मागे पाहिलं नाही. तो एकसारखा मागेपुढे होतं घुमत होता.

टोनीने सावकाशपणे जवळ जात अजयच्या पाठमोऱ्या खांद्यावर हात ठेवून त्याला वळवण्याचा प्रयत्न केला. त्या स्पर्शाने अजय अचानक हलायचा थांबला आणि गर्रकन मागे वळाला. त्याच्या अशा अचानक मागे वळल्याने टोनी घाबरून जरासा मागे सरला. अजयचा चेहरा खूपच भेसूर दिसतं होता. त्या अंधुक प्रकाशाच्या खोलीपण त्याचे लाल डोळे भयानक दिसतं होते. अजयच्या शर्टवर रक्ताचे थेंब सुद्धा उडालेले दिसत होते.

"अजय अजय.. काय झालंय तुला" असं म्हणत टोनी घाबरून फक्त अजयकडे पाहतच होता.

"हमम... रक्त.." अजयच्या घशातून विचित्र आवाज आला. जणूकाही हा आवाज अजयचा नसून त्याच्या शरीरातून कोणीतरी दुसरंच बोलत होतं असा भासत होता. अजयच्या हातात काहीतरी लांब वस्तू होती. टोनी पुतळ्याप्रमाणे स्तब्ध उभा होता. अजय थोडा पुढे झाला आणि त्याचा हात वर झाला. टोनीच लक्ष आता त्याच्या हाताकडे गेलं तेव्हा त्याला दिसलं कि अजयच्या हातात मोठा हातोडा आहे. त्या हातोड्याच्या पुढे रक्त लागलेलं होतं.

खाड खाड... हातोड्याचा आवाज घुमला. टोनी जमिनीवर गतप्राण झालेला होता. रक्त आजूबाजूला पसरलेलं होतं.

अजय त्या खोलीतून बाहेर आला. हातातील हातोडा जमिनीवर घासत अडखळत तो पुढे चाललेला असल्याने हातोड्याचा खरखर आवाज घुमत होता. अजयची हालचाल जणूकाही कोणीतरी त्याला आदेश देत असल्याप्रमाणे होत होती. खालच्या मजल्यावर येऊन त्याने खाली असणाऱ्या घरमालकाच्या खोलीत प्रवेश केला.

खाड..खाड..परत हातोड्याचा आवाज घुमला. आवाजानंतर खोली रक्ताने माखली…

मग यानंतर सगळीकडेच शांतता झाली.

दुसऱ्या दिवशी अजयला जाग आली. सकाळ झालेली होती आणि तो कोणत्या तरी गाडीत होता. त्याचं डोकं चांगलंच जड झालेलं होतं जणूकाही भिंतीवर आपटून ते बधिर झालं असावं. डोळे चोळत तो आसपास पाहू लागला.

खाकी वर्दीतील लोक त्याला गाडीबाहेर दिसले. त्याची नजर आपल्या हाताकडे गेली तर हातात हातकड्या होत्या. हे सगळं पाहून तो चाटच पडला. गाडीच्या बाहेर एक खाकी वर्दीतील माणूस उभा राहून फोन वर बोलत होता.

"हो साहेब, ४ मृतदेह सापडलेत हॉटेलवर आणि एक खाली हॉटेलच्या बाहेर शेकोटीजवळ आहे. हो गुन्हेगार आमच्या कस्टडीमधेच आहे. हत्यारावरचे ठसे आणि अंगावरच्या कपड्यावर रक्त होतं त्यामुळे चटकन समजलं.. हो गाडीत टाकलंय त्याला.. पोलिसस्टेशनवरच घेऊन येतोय"

अजयने आपल्या कपड्यांकडे पाहिलं तर त्याचे कपडे पूर्णपणे कोरड्या रक्ताने माखलेले होते. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याला काहीही आठवत नव्हतं. अचानक एक खाकी वर्दीवाल्या माणसाने गाडीत प्रवेश केला आणि त्याने गाडी सुरु केली.

"अरे..अरे.. कुठे नेताय मला.. मी काहीही केलेलं नाहीये..." अजय ओरडून म्हणाला. त्याच्या बोलण्याचा त्या खाकी वर्दीवाल्यावर काही परिणाम झाला नाही. शांतपणे त्याने गाडी हॉटेलच्या बाहेर काढली कारण सगळे पुरावे अजयच्या खुनी असण्याकडेच निर्देश करत होते.

"अरे अरे... ऐका माझं... मला काहीही आठवतं नाहीये. माझे मित्र कुठे आहेत सगळे" असं म्हणत गाडीच्या मागच्या काचेतून अजयने हॉटेलकडे नजर टाकली. हॉटेलपुढे २ खाकी वर्दीवाले लोकं जमिनीवर पांढरं कापडं टाकून झाकुन ठेवलेल्या ४-५ प्रेतांकडे पाहत काहीतरी बोलत होते. अजयची नजर हॉटेलच्या वरच्या मजल्याकडे जाताच भीतीने त्याचे डोळेच मोठे झाले.

हॉटेलच्या वरच्या मजल्यावरच्या असणाऱ्या "त्या" खोलीतील काचेच्या खिडकीत पडद्याजवळ एक काळी सावली गाडीकडेच पाहत उभी होती. अजय आ वासून पाहत होता आणि हॉटेलपासून पुढे जाणाऱ्या गाडीकडे पाहत ती धुरकट सावली स्थिरपणे तशीच उभीच होती.

==========

(या कथा वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया ७३५०९३३६९० या व्हॉटस्एप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक





मंडळी!

अक्षय जाधव यांची ही पुस्तकं वाचा. फक्त कव्हरवर क्लिक करा. पुस्तक उघडेल.

ई साहित्यची इतर पुस्तक वाचण्यासाठी...

esahity@gmail.com

9987737237 (एक व्हट्सप मेसेज पाठवा. भरपूर पुस्तकं मिळवा)

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.